# सार्वजनिक उपक्रम समिती

( २००५-२००६ /२००६-२००७)

( अकरावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००१-२००२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (वाणिज्यिक) यांच्या अहवालातील परिच्छेद क्रमांक २.४.२, २.६.३.१, २.६.४.१, २.६.४.१.२, २.६.४.२, २.६.५.१, २.६.५.२, २.६.६ व २.६.७ यावरील समितीचा**

# सहावा अहवाल

( दिनांक डिसेंबर, २००६ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.

# सार्वजनिक उपक्रम समिती

( २००५-२००६ /२००६-२००७)

( अकरावी महाराष्ट्र विधानसभा )

**महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००१-२००२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (वाणिज्यिक) यांच्या अहवालातील परिच्छेद क्रमांक २.४.२, २.६.३.१, २.६.४.१, २.६.४.१.२, २.६.४.२, २.६.५.१, २.६.५.२, २.६.६ व २.६.७ यावरील समितीचा**

# सहावा अहवाल

# सार्वजनिक उपक्रम समिती
## (२००५- २००६)

| | समिती प्रमुख |
|---|---|
| (१) | श्री. नाना पटोले, वि.स.स. |
| | **समिती सदस्य** |
| (२) | श्री. सुरेश वरपूडकर, वि.स.स. |
| (३) | श्री. बशीर मुसा पटेल, वि.स.स. |
| (४) | श्री. रमेश कदम, वि.स.स. |
| (५) | श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स. |
| (६) | श्री. राजवर्धन कदमबांडे, वि.स.स. |
| (७) | श्री. राजेंद्र दर्डा, वि.स.स. |
| (८) | श्री. बंडूभाऊ सावरबांधे, वि.स.स. |
| (९) | श्री. पी.यु.मेहता, वि.स.स. |
| (१०) | श्री. रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स. |
| (११) | श्री. मदन पाटील, वि.स.स. |
| (१२) | श्री. हरिदास भदे, वि.स.स. |
| (१३) | श्री. अरविंद नेरकर, वि.स.स. |
| (१४) | श्री. गुलाबराव पाटील, वि.स.स. |
| (१५) | श्री. प्रतापराव जाधव, वि.स.स. |
| (१६) | श्री. उत्तमप्रकाश खंदारे, वि.स.स. |
| (१७) | श्री. अरुण पाटील, वि.स.स. |
| (१८) | डॉ. विनय नातू, वि.स.स. |
| (१९) | श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स. |
| (२०) | श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स. |
| (२१) | श्री. संजय दत्त, वि.प.स. |
| (२२) | श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स |
| * (२३) | रिक्त |
| (२४) | श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. |
| (२५) | श्री.अरविंद सावंत, वि.प.स. |

*श्री. वसंत काळे, वि.प.स. समिती सदस्य यांचे दिनांक २ फेब्रुवारी, २००६ रोजी निधन झाल्यामुळे रिक्त.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास पाटील, प्रधान सचिव (१)
श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
| --- | --- | --- |
| | **प्रस्तावना** | |
| **एक** | **महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ (ले.प.अ. २००१-२००२)** | |
| (१) | उसनवारी (परिच्छेद क्रमांक २.४.२) | |
| (२) | उधारीवर कच्चा माल पुरवठा करण्याची योजना, पात्रता व पुरवठ्याचे मार्ग, उत्तर दिनांकित धनादेश योजना रु.५ लाखापेक्षा जास्त व अयोग्य पतमुल्यमापन व एकेकाला अदेय फायदा (परिच्छेद क्रमांक २.६.३, २.६.३.१, २.६.४.१ व २.६.४.१.२) | |
| (३ | रुपये ५ लाखापर्यंतचे उत्तर दिनांकित धनादेश योजना (परिच्छेद क्रमांक २.६.४.२) | |
| (४) | एका कच्चा मालाच्या खरेदीसाठी वखारपालन कार्यासह पतसवलत योजना व नागपूर येथील मेहता समुहाच्या कंपन्यांनी अनधिकृतरित्या काढलेला माल (परिच्छेद क्रमांक २.६.५ व २.६.५.१) | |
| (५) | सातारा येथील एकेकाने अनधिकृतरित्या काढलेला माल (परि (परिच्छेद क्रमांक २.६.५.२) | |
| (६) | योजनेच्या अटींचे पालन करण्यात अपयश व बिनतारण योजना (परिच्छेद क्रमांक २.६.६ व २.६.६.१) | |
| (७) | अस्तित्वात असलेल्या कोणत्याही योजनांच्या व्याप्तीत नसलेली विलक्षण पतसवलत देणे (परिच्छेद क्रमांक २.६.७) | |
| **दोन** | **बैठकीचे परिशिष्ट** | |

# प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००१-२००२ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (वाणिज्यिक) यांच्या अहवालातील महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाच्या कामकाजासंबंधात परिच्छेद क्रमांक २.४.२, २.६.३, २.६.३.१, २.६.४.१, २.६.४.१.२, २.६.४.२, २.६.५., २.६.५.१, २.६.५.२, २.६.६, २.६.६.१ व २.६.७ यावरील समितीचा सहावा अहवाल (अकरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग व महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर व माहितीवर समितीने विचार केला. बुधवार, दिनांक २० सप्टेंबर २००६ रोजी विभागीय सचिवांची व महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली.

श्रीमती संगिता चौरे, महालेखाकार, (वाणिज्यिक लेखा परिक्षा) व श्री. पी.पी.लोणकर वरिष्ठ लेखा परिक्षा अधिकारी यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकांना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

उद्योग,उर्जा व कामगार (उद्योग) विभागाचे सचिव श्री. व्ही.के.जयरथ तसेच महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, श्री. एम.रमेशकुमार, सह व्यवस्थापकीय संचालक, श्री. सतिश गंजू यांनी दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचेसुध्दा आभार मानते.

समितीने ----वार, दिनांक ---- २००६ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो सुधारणांसह संमत केला.

**नाना पटोले,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

विधान भवन,
मुंबई, ---वार, दिनांक, २००६.

# महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ

## एक : उसनवारी -

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००१-२००२ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक २.४.२ मध्ये "उसनवारी" या संबंधात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

कंपनीने राज्य शासनाकडून भारतीय लघुउद्योग विकास बँक (सिडबी) व इतर बँका यांच्याकडून खेळत्या भांडवलाची आवश्यकता भागविण्यासाठी व स्वेच्छा निवृत्ती योजना राबविण्यासाठी उद्योग विकास आयुक्तांकडून कर्जाऊ निधी घेतला होता. दि. ३१ मार्च २००१ रोजी रु. १९.४६ कोटीची कर्जे थकित होती.

कंपनीने प्रथम एक वर्ष कालावधीसाठी व ती नंतर वेळोवेळी वाढविलेल्या कालावधीसाठी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडून (एम.एम.आर.डी.ए.) प्रतिवर्ष १५ टक्के व्याज दराने कमी मूदतीचे कर्ज घेतले होते. ३१ मार्च, १९९७ रोजी एकूण कमी मुदतीचे कर्ज रु.१८.०० कोटी एवढे होते. त्यापैकी कंपनीने रु.४ कोटी कर्जाची (ऑक्टोबर १९९७ व मार्च १९९८ मध्ये प्रत्येकी रु.२ कोटी प्रमाणे) परतफेड केली होती. उर्वरित रु.१४ कोटीचे कर्ज परतफेडीसाठी ऑक्टोबर १९९८ (रुपये १२ कोटी) व एप्रिल १९९९ (रुपये २ कोटी) पर्यंत देय होते. कंपनीने रु.१२ कोटीचे कर्ज ताबडतोब फेडावे म्हणून एमएमआरडीए ने तगादा (सप्टेंबर १९९८) लावला व कर्ज मुदतवाढ देण्याचे नाकारले. एमएमआरडीए ने ऑक्टोबर १९९८ पासूनच्या वाढीव कालावधीसाठी कर्ज परतफेड करेपर्यंत २ टक्के अतिरिक्त दंडात्मक व्याजाची मागणी (नोव्हेंबर १९९८) केली. कंपनीवरील कर्ज देय तारखेला (ऑक्टोबर १९९८) परतफेड करुन शकली नाही व त्यामुळे कंपनीला ऑक्टोबर १९९८ ते सप्टेंबर १९९९ या कालावधीसाठी रु.२४.४६ लाखाचे दंडात्मक व्याजाचे प्रदान करावे लागले. एमएमआरडीए ने ऑक्टोबर १९९९ ते डीसेंबर २००० या कालावधीसाठी रु.१६.७० लाख दंडात्मक व्याजाची मागणी केली होती. परंतू त्याचे प्रदान करण्यात आले नव्हते (जून २००२).

मूर्त प्रतिभूति किंवा राज्य शासनाच्या हमीवर सिडबी कर्जमर्यादा रु.३ कोटीवरुन रु.१० कोटीपर्यंत वाढविण्यास तयार (डिसेंबर १९९८) होती असे निदर्शनास आले परंतू कंपनीकडे प्रतिभूति म्हणून दयावयाच्य जमिनिचे भाडेपट्टा करार उपलब्ध नव्हते किंवा भाडेपट्टा करार कार्यान्वित केले नव्हते किंवा त्याचे नोंदणीकरण केले नव्हते त्यामुळे कंपनी मूर्त प्रतिभूति सादर करु शकली नाही. कंपनीने मार्च २००२ पर्यंत शासकीय हमीपत्र दिले नव्हते किंवा भाडेपट्टा करारही कार्यान्वित केले नव्हते. कंपनीने विविध इतर प्रतिभूति देवू केल्या (एप्रिल २०००) परंतू सिडबीने अस्तित्वात असलेले रु. ३ कोटीचे कर्ज व्याजासहीत परत करण्याची अट घातल्यामुळे (जून २०००) त्या प्रतिभूति स्विकारल्या नाहीत. कंपनीने त्या अटींची पूर्तता केली नाही व कर्जसुध्दा घेतले नाही.

अशा रीतीने मत्ताचे व्यवस्थित कागदपत्रीकरण नसल्यामुळे कंपनी रु.७.०० कोटीचे वाढीव कर्ज सिडबीकडून घेवू शकली नाही व ते कर्ज एमएमआरडीए चे कर्ज परतफेडीसाठी वापरात आले असते व एमएमआरडीएला दंडात्मक व्याजाचे दिलेले / दयावयाचे व्याज कमी करता आले असते.

१.२ यासंबंधात महामंडळाने स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात खुलासा करताना असे नमूद केले की, महामंडळाने द.सा.द.शे. १५ टक्के दराने एमएमआरडीएकडून रु.१८.०० कोटी कर्जाऊ घेतले त्यानंतर एम.एम.आर.डी.ए.ने लगेच आपल्या व्याजदरात कपात केली व आपणहून विविध शासकीय संस्थांना कमी केलेल्या व्याजदराने वित्त पुरवठा केला. महामंडळाने विविध उपक्रम हाती घेतल्यामुळे, महामंडळास वित्तीय सहाय्याची निकड भासल्यामुळे एमएमआरडीए कडून झालेला वित्त पुरवठा परत पाठविण्याची शक्यता नव्हती. काही शासकीय संस्थांना एमएमआरडीए ने स्वतःहून व्याजदरात कपात केली तसेच दंडाई व्याजाची रक्कम माफ केली. एमएमआरडीए व म.ल.उ.वि. महामंडळ या दोन्ही संस्थांच्या व्यवस्थापकीय संचालकपदी शासनातर्फे भारतीय प्रशासन सेवेतील व्यक्तिची नेमणूक करण्यात आली असल्यातुळे एमएमआरडीएने इतर संस्थांच्या बाबतीत दंडाई रक्कम माफ करण्याचा जो निर्णय घेतला त्याच धर्तीवर एमएमआरडीएने दंडाई रक्कम माफ करण्याकरिता म.ल.उ.वि. महामंडळाने सतत

पाठपुरावा केला आहे. सदर प्रकरण अद्यापही अनिर्णित अवस्थेत असल्यामुळे कर्जाची रक्कम तेव्हा चुकती केली नव्हती. तसेच लेखापरिक्षकांना असे वाटते की, महामंडळाने सांपर्श्विक प्रतिभूति सादर केली असती तर महामंडळास एसबीआय किंवा सिडबी यांच्यामार्फत निधी उभारता आला असता व एमएमआरडीएला अल्पमुदतीचे घेतलेले कर्ज परत करता आले असते. तथापि वास्तविक परिस्थिती वेगळी आहे. एसबीआय ने मंजूर केलेल्या रु.१००० लाखाचा पतपुरवठा मर्यादेपैकी रु.५०० लाखाच्या रकमेच्या पतपुरवठ्याच्या आणि सिडबीमार्फत रु.३०० लाखाचा पतपुरवठ्याचा महामंडळ वापवर करीत आहे. यानुसार या दोन वित्तीय संस्थेमार्फत जास्तीत जास्त रु.२०० लाख रक्कमेचा पतपुरवठा होणे शक्य होते. त्याचप्रमाणे विविध पतपुरवठ्यांसंदर्भात एसबीआयकडून दिरंगाई झाली. महामंडळास एसबीआयच्या दि.२०/०१/१९९७ च्या पत्र क्र.सीॲण्डआय/एपीएस ९६-९७/७४ अन्वये मंजूरी कळविण्यात आली. सदर पत्र मिळाल्यानंतर महामंडळाने पत्र क्र.सीएस/९७-९८/१२४ दि़०१.१२.९७ अन्वये सांपर्श्विक प्रतिभूति मिळण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्राकरिता शासनाशी संपर्क साधला. दि.१६/०२/२००० राजी ना हरकत प्रमाणपत्र शासनाकडून पाठविण्यात आले.

वरील विवेचनानुसार असे स्पष्ट होत आहे की, एसबीआयकडे सांपर्श्विक प्रतिभूति सादर करण्यात, मलउवि. महामंडळाकडून कोणतीही दिरंगाई झालेली नाही. अखेर दि.२९/०२/२००० रोजी महामंडळाने आपली मालमत्ता गहाण ठेवली. सिडबीसंदर्भात स्पष्ट सांगाचये तर जरी त्यांनी रु.५०० लाखाचा पतपुरवठा मंजूर केल्यानंतर आणि हामंडळाने आपल्या दि.२०/०४/२००० च्या पत्र क्र.एफॲण्डए/सिडबी एलओसी/२०००-०१ नुसार विविध प्रतिभूमि सादर केल्यावरही त्यांच्याकडून अद्यापही महामंडळाने सादर केलेल्या प्रतिभूतिंचा प्रस्ताव स्वीकारण्यात आलेला नाही. महामंडळाने त्यांना शासकीय हमीचा प्रस्ताव सादर केला नाही कारण त्याकरिता २ टक्के इतके हमी शुल्क द्यावे लागेल.

वरीलनुसार महामंडळास सिडबीकडूनच रु.७०० लाख जादा कर्ज घेता आले नाही असे म्हणणे वस्तुस्थित्ीला धरुन नाही.

याकरिता दंडाची रक्कम टाळण्यासंदर्भात लेखापरीक्षकांनी विषद केलेल्या मतांशी म.ल.उ.वि.महामंडळ सहमत नाही. लेखापरीक्षणाच्यावेळी सदर माहिती लेखापरीक्षकांना दिली होती. तरीही त्यांनी या संदर्भातील परिच्छेद गाळला नाही.

१.३ महामंडळाने केलेल्या कार्यवाहीबाबत शासनाने सहमती दर्शविली आहे.

१.४ महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने उद्योग विभागाच्या सचिवांची व महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांची दिनांक २० सप्टेंबर २००६ रोजी साक्ष घेतली. महामंडळाने १५ टक्याने कर्ज घेऊन निरनिराळ्या युनिटांना १५ टक्क्यांनी कर्ज दिले यामुळे जो तोटा झाला त्याची जबाबदारी कोणावर या समितीच्या प्रश्नावर साक्षीच्या वेळी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी माहिती दिली की, महामंडळाने मुंबई महानगर प्रादेशीक विकास प्राधिकरणाकडून १५ टक्के दराने कर्ज घेऊन ३४७ युनीट्सना १५ टक्क्याने कर्ज दिले. यामध्ये १६० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. मात्र अद्याप १४१ युनीटस्कडून १५ कोटी रुपये येणे बाकी आहे. तसेच काही शासकीय संस्थांना दिलेल्या कर्जावरील व्याज दरात कपात व दंडाच्या व्याजाची रक्कम माफ केली. मात्र एम.एम.आर.डी.ए. ने व्याजदरात व दंडाच्या व्याजात सवलत दिली नाही. यामध्ये २६.९३ कोटी रुपये मुद्दल व त्यावरील १३.३० कोटी रुपये व्याज येणे आहे. सदर रक्कम १९९७ सालापासूनची आहे. याबाबत काही युनीटस्कडून देण्यात आलेले पोस्ट डेटेड चेक्स असून सदरहू चेक वटले गेलेले नाहीत. त्यावर निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टच्या सेक्शन १३८ खाली काही युनीटस्वर कारवाई केली आहे व अंदाजे सात युनीटस्बाबत प्रोसीजर (कलम १५६) अन्वये फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. कृष्णा प्लास्ट्रोकेम व सी.आर.ए. या प्रकरणामध्ये कोर्टाचे आदेश मिळाल्यानंतर दि. १ एप्रिल २००५ रोजी त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. त्यांच्याकडून ७२ लाख रुपयाची रक्कम वसूल होऊ शकली नव्हती. या प्रकरणामध्ये कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडून ठरलेल्या मुदतीमध्ये कर्ज फेड न केल्यामुळे २ टक्के अतिरिक्त दंडाची मागणी केली. सदर दंडात्मक

कारवाईस स्थगिती देण्यास मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने नकार दिल्यामुळे अतिरिक्त दंडापोटी ऑक्टोबर १९९८ ते सप्टेंबर १९९९ या कालावधीचे २४.४६ लाख रुपये महामंडळास दंडात्मक व्याजापोटी भरावे लागले. सिडवीकडून कर्जमर्यादा वाढवून देण्याची तयारी दर्शविली गेली होती. परंतु सिक्युरीटी व बँक गॅरंटीची अट शिथील करण्यास सिडवी तयार नसल्याने सिडवीकडून कर्ज घेता आले नाही. सध्या महामंडळाची आर्थिक स्थिती समाधानकारक नसून सध्या महामंडळ तोट्यामध्ये आहे व आकस्मिक खर्चासाठी स्टेट बँकेकडून दोन कोटी रुपयांची क्रेडीट मर्यादा मंजूर करुन घेतली आहे व सदर रकमेमधून अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च भागविला जात आहे. महामंडळाचा हा खुलासा ऐकून समितीने मत व्यक्त केले की, महामंडळाने आपल्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्याची व त्यासाठी ठोस पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे. यावर व्यवस्थापकीय संचालकांनी खुलासा केला की, मार्केटींग कार्यक्रम वाढविण्यासाठी विभागीय व्यवस्थापकांना सूचना दिल्या आहेत. गेल्या वर्षी रु.१३० कोटींचे लक्ष्य दिले होते तेही यावर्षी वाढवून दिले आहे. तसेच प्रशासकीय जागा (पदे) कमी करण्यात येत आहेत. शिवाय शहरी ॲसेटवर योग्य मिळकत होत नाही म्हणून व्यापारी तत्वावर निर्यात करुन बी.ओ.टी. पध्दतीने जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न सुरु आहे आणि वसूलीही जास्तीत जास्त करण्यात येणार आहे. तसेच बऱ्याच वर्षांचे हिशोब अपूर्ण असल्याने बँकांना जास्त व्याज द्यावे लागत होते. आता सन २००३-०४ पर्यंतचे हिशोब पूर्ण केले आहेत. फक्त दोन वर्षांचे हिशोब करणे बाकी आहे तेही लवकरच पूर्ण करण्यात येतील. अशा प्रकारे आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

महामंडळाकडून तयार केलेल्या वस्तु शासन खरेदी करीत नाही. या मुद्याबाबत चर्चा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, रेट कॉन्ट्रॅक्टसंदर्भात बोलणी सुरु असून सध्या समितीमध्ये २१ वस्तुंचा रेट कॉन्ट्रॅक्ट ठरविण्यात आला असून महामंडळाच्या किंमतीपेक्षा स्वस्त दरामध्ये बाजारामध्ये वस्तु मिळत असल्यामुळे महामंडळाच्या मोठ्या वस्तुसाठी मागणी नोंदवली जात नाही. लघुउद्योगांच्या किरकोळ

वस्तूंसाठी विक्रीमध्ये शासनाने दिलेल्या सवलतीचा थोडाफार उपयोग होतो. परंतु मोठ्या वस्तुंच्या विक्रीमधून जास्त उलाढाल होते व फायदाही होतो. यावर समितीने मत व्यक्त केले की, महामंडळाचा ५० टक्के माल खरेदी करणे शासनावर बंधनकारक करावे. मात्र महामंडळाच्या वस्तूही दर्जेदार व किंमतीमध्ये माफक असावयास हव्यात.

१.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

या आक्षेपांच्या संदर्भात समितीला मिळालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी मिळालेली माहिती याचा विचार करता, समितीला असे दिसून आले की, एवढा मोठा व्याप असणारे आणि नेहमी फायद्यात असणारे महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळ सध्या फार मोठ्या तोट्यात आहे. आकस्मिक खर्चासाठी तसेच अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतनाचा खर्च भागविण्यासाठी महामंडळाने स्टेट बँकेकडून दोन कोटी रुपयांची पत मर्यादा मंजूर करुन घेतली आहे. ही बाब शासनाला आणि महामंडळाला अतिशय लांच्छनास्पद आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. याला जबाबदार शासन आणि महामंडळ हे दोन्हीही आहेत असे समिती नोंदवू इच्छिते. कारण शासनाचे महामंडळावर पूर्ण नियंत्रण व वचक नाही. आणि महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी महामंडळाच्या फायद्याचा आणि व्यापारी तत्त्वाचा विचार न करता वेळोवेळी केलेली कृती हेच यास कारणीभूत आहे. मुंबई महानगर प्रादेश्‍कि विकास प्राधिकरणाकडून १८ कोटी रुपये कर्ज १५ टक्के व्याजाने घेऊन ते युनिटना १५ टक्के दरानेच देण्यात आले होते. अशा पध्दतीने रु.१६०/- कोटींचे वाटप करण्यात आले होते. म्हणजे जेवढे व्याज महामंडळाला मिळणार होते तेवढेच ते त्यांना कर्जापोटी भागवावयाचे होते. उलट मुद्दलाची रक्कम वेगळी होती. तीही वेळेवर भागविली नाही तर दंडव्याज देय होते. या प्रकरणी तेही घडले आहे आणि रु.२४.४६ लाखाचे दंडात्मक व्याज प्रदान करावे लागले. वास्तविक सामान्य माणूसही अशापध्दतीने व्यवहार करणार नाही. उलट महामंडळाला अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाचा खर्च करावयाचा असून विकासाचे पाऊल उचलण्यासाठी फायद्याचाही विचार करणे भाग आहे. या सर्व गोष्टींचा विचार बाजूला ठेवून महामंडळाने असा व्यवहार का केला याची वास्तविक मोठ्या प्रमाणात व सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. असे समितीचे

स्पष्ट मत आहे. महामंडळाने लेखी दिलेल्या खुलाशात सुरुवातीलाच म्हटलेले आहे की, १५ टक्के दराने १८ कोटी कर्जाऊ घेतले व लगेच एम.एम.आर.डी.ए. ने व्याज दरात कपात केली आणि आपणहून विविध संस्थांना कमी व्याजदराने पुरवठा केला. सिडबी बँकेने कर्ज मर्यादा वाढवून देण्याची तयारी दर्शविली होती. परंतु ती कर्ज वसूल होण्याच्या दृष्टिने सुरक्षितता व बँक हमीची अट शिथिल करण्यास तयार नव्हती यावरुन महामंडळाने बोध घ्यावयास हवा होता. तरीही महामंडळाने हा आतबट्याचा व्यवहार का केला याचीही चौकशी होणे गरजेचे वाटते. तसेच या कामी शासनाची मंजूरी घेतली होती काय हेही पहावे लागेल. जर शासनाने मंजूरी दिलेली असेल तर शासनही दोषी ठरते. वास्तविक हे व्यापारी महामंडळ आहे. तोटा होणार नाही याची काळजी घेणे जरुरीचे असतांना असा अव्यवहार्य निर्णय कसा काय घेतला गेला हेही विचारात घेणे आवश्यक आहे याच संदर्भात २६.९३ कोटी रुपये मुद्दल व १३.३० कोटी रुपये व्याज येणे बाकी असल्याचे साक्षीच्या वेळी सांगण्यात आले. कर्ज घेणाऱ्या युनिट्स कडून देण्यात आलेले पोस्टडेटेड धनादेश वटले गेले नाहीत. काही प्रकरणी निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टच्या १३८ खाली व फार थ्ोडया प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आल आहेत. १९९७ पासून आता याला १० वर्षे होत आली व प्रकरण्ो प्रलंबित आहेत. शिवाय या प्रकरणी एकाही अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही हे सर्व पहाता महामंडळ यात दोषी असल्याचेच दिसून येते. खरे पहाता समितीचे स्पष्ट मत आहे की, हा त्यावेळच्या संबंधित अधिकाऱ्यांनी हा जाणूनबूजून व संगनमताने घेतलेला निर्णय असावा. कारण त्यामध्ये त्यांचा व कर्ज घेणाऱ्यांचा हितसंबंध दडलेला असावा. त्याशिवाय असा निर्णय होऊच शकत नाही. म्हणून शासनाने लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करावी व सर्वच दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेश द्यावेत अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात व पुढे प्रगतीनुसार देण्यात यावी.

महामंडळाने आपल्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी काही ठोस पाऊले उचलल्याचा साक्षीच्या वेळी खुलासा केला. वास्तविक आर्थिक परिस्थित्ी

नेहमीच चांगली राहिल याचे भान ठेऊनच महामंडळाने आपले व्यवहार करणे आवश्यक आहे. ज्यावेळी महामंडळ पूर्णत: तोट्यात गेले त्यावेळी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना याची जाणिव झाली आहे. तरीसुध्दा अद्याप वेळ गेलेली नाही असे समितीचे मत आहे. म्हणून समिती स्पष्टपणे अशी शिफारस करते की, महामंडळाने जी सुधारणात्मक पाऊले उचलली आहेत ती ठोसपणे व लक्ष्य गाठण्याच्या उद्दिष्टाने टाकावीत व ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोवविण्यात आली आहेत ती त्यांच्याकडून पूर्ण करुन घेण्यात यावी. अन्यथा अशी अकार्यक्षक अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करावी. त्याचवेळी जे वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांचीही जबाबदारी कमी होत नाही. उलट त्यांचीही जबाबदारी वाढती आहे. वरिष्ट पदांवरील अधिकारीही अकार्यक्षक नसतील असे नाही. केवळ आदेश देण्याचे काम करुन त्यांना चालणार नाही. त्यांनीही तितक्याच कार्यक्षमतेने या कामी लक्ष घालणे अगत्याचे आहे. केवळ पदापुरता एखादा अधिकारी जागा अडवून असेल तर त्याचीही गय महामंडळाने करु नये. म्हणून महामंडळाने फायद्यात येण्यासाठी सर्व प्रकारच्या आणि वेळप्रसंग पाहून नविन-नविन उपाययोजना अंमलात आणाव्यात आणि वाटप केलेले कर्ज त्वरीत वसूल होण्यासाठी सर्व प्रकारच्या मार्गांचा नियमांचा अवलंब करावा. तसेच कर्ज वसूल होईल याची हमी/खात्री वाटत असेल अशाच युनिटना यापुढे कर्जाचे वाटप करावे जेणेकरुन न्यायालयीन प्रक्रिया हाताळण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

महामंडळाकडून तयार करण्यात आलेल्या वस्तू शासन वेगवेगळ्या विभागांमार्फत खरेदी करीत नाही असेही साक्षीच्या वेळी महामंडळाने समितीच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत नेमलेल्या समितीने केवळ २१ वस्तूंबाबतच आतापर्यंत रेट कॉन्ट्रक्ट ठरविण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम पाटबंधारे अशा व इतरही विभागांना नेहमी छोट्या मोठया वस्तुंची गरज असते. परंतु जर बाजारात कमी दरात व दर्जेदार वस्तू मिळत असतील तर महामंडळाच्या महाग वस्तू कोण खरेदी करेल असा एक चर्चेचा सूर दिसून आला. ही सर्व वस्तुस्थिती पाहिल्यावर समितीने असे मत व्यक्त केले आहे की, महामंडळानेही बाजारातील दराशी व दर्जाशी स्पर्धा होईल अशा वस्तूंचे उत्पादन करावे जेणेकरुन शासनाच्या विभागांना त्या विकत घेणे परवडेल व

सुलभ होईल व शासन बाजारातून अशा वस्तू खरेदी करणार नाही. तेंव्हा यासंदर्भात समितीची शिफारस आहे की, महामंडळाने तयार केलेल्या वस्तू या दर्जेदार स्वरुपाच्या व बाजारातील किंमतीशी स्पर्धा करणाऱ्या असाव्यात तर त्यांचा खपही वाढेल व शासनाचे वेगवेगळे विभागही या वस्तू खरेदी करु शकतील. शासनानेही याचा गांभिर्याने विचार करावा व महामंडळाला सहाय्य करण्याच्या उद्देशाने ५० टक्के वस्तू शासनाच्या विभागांनी खरेदी करण्याबाबत त्यांच्यावर नियमाने बंधन घालण्यात यावे व तसे सर्व विभागांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे. या संबंधात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत देण्यात यावी.

## दोन :- योजनांची ठळक वैशिष्ट्ये :-

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००१-२००२ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक २.६.३, २.६.३.१, २.६.४.१ व २.६.४.१.२ मध्ये अनुक्रमे **"उधारीवर कच्चा माल पुरवठा करण्याची योजना" "योजनांची ठळक वैशिष्ट्ये" "दिनांकित धनादेश योजना रु. ५ लाखापेक्षा जास्त" व "अदेय पतमुल्यमापन व एककाला अदेय फायदा"** या संबंधात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

लघुउद्योगांना कच्चा माल पुरवठा सहाय्य करण्यासाठी कंपनीने राबविलेल्या चार योजनांच्या अंतर्गत ३१ मार्च २००२ रोजी १४१ लघुउद्योगाकडून रुपये १५.८८ कोटीची रक्कम थकित होती.

उधारीवर कच्चा माल पुरवठा करणाऱ्या योजना लघुउद्योगांना उधारीवर कच्य मालाचा पुरवठा सहाय्य अंतर्गत कंपनीने सहाय्य देयसाठी चार योजना कार्यान्वित केल्या. १९९७-२००२ या कालावधीत योजनानिहाय सहाय्य केलेले एकके, त्यांना संवितरित केलेली रक्कम व ३१ मार्च २००२ रोजी थकित असलेल्या रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे होता.

**(रुपये कोटीत)**

| योजनेचे नाव | सहाय्य केलेल्या एककांची संख्या | संवितरित केलेली रक्कम | ३१ मार्च २००२ रोजी थकित असलेली रक्कम | |
|---|---|---|---|---|
| | | | एककांची संख्या | रक्कम |
| १. उत्तर दिनांकित धनादेश (पीडीसी) योजना | | | | |
| (अ) पतमूल्य मापनासह (रु.५ लाखापेक्षा अधिका) | ३४ | २३.८६ | २२ | ४.०९ |
| (ब) पतमूल्य मापन विरहित (रु.५ लाखापर्यंत) | १८७ | १३.८१ | ६६ | १.९५ |
| २. वखार पालन/सुधारित वखार पालन योजना | २२ | २५.५८ | १४ | ६.८५ |
| ३. बील तारण योजना | २३ | ४१.७७ | ०७ | ०.८२ |
| ४. बँक हमी योजना | ८१ | ५५.५१ | ३२ | २.१७ |
| एकूण---- | ३४७ | १६०.५३ | १४१ | १५.८८ |

२.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने नमूद केले की, "वास्तविक परिस्थिती, वेगळया टिप्पणीची आवश्यकता नाही."

२.३ महामंडळाच्या वरील खुलाशाबाबत शासनाने सहमती दर्शविली आहे.

२.४ **पात्रता, पुरवठ्याचे मार्ग -**

पात्र लघुउद्योग एकके सर्व प्रकारच्या कच्च्या मालासाठी या सवलतीचा फायदा घेऊ शकत होते फक्त त्यासाठी त्यांनी कंपनीशी सल्लामसलत करुन लिखित मागणीपत्र व पुरवठ्याचा मार्ग निश्चित करुन त्यासाठी बँकेची हमी/पतपत्र किंवा इतर प्रकारची सुरक्षा द्यावयाची होती.

पुरवठा व्यवस्था -

लघुउद्योग एककांकडून मिळालेल्या निश्चित मागणीपत्राच्या आधारावर विर्निदिष्ट कमीत कमी मात्रेसाठी कच्च्या मालाच्या पुरवठ्याची सरळ पोहचवणी तत्वावर व्यवस्था करावयाची होती. दर कंपनीला स्वीकारार्ह असावेत या अटीवर त्या-त्या उत्पादकांबरोबर एककाने वाटाघाटीत करावयाचे होते. खरेदी केलेला माल एककाने क्लीअर करुन त्याची वाहतूक एककाने स्वत:च्या खर्चाने व हमीवर करावयाची होती. कंपनीने मालाच्या किंमतीचे प्रदान उत्पादकाला थेट करुन मालाचे बीजक मान्य केलेल्या दराने (ज्यात सेवा आकाराचा समावेश होता) एककावर द्यावयाचे होते.

उत्तर दिनांकित धनादेश योजनेअंतर्गत एका समापन प्रक्रियेत असलेल्या एककाला अनियमित सहाय्य, युकीचे पतमूल्यमापन व एककांना अनधिकृत पत कालावधीत वाढ देणे या गोष्टी निदर्शनास आल्या त्यामुळे रु.२.८५ कोटीचा निधी अडकून पडला होता.

२.५ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने नमूद केले की, "वास्तविक परिस्थिती, वेगळया टिप्पणीची आवश्यकता नाही."

२.६ महामंडळाच्या वरील खुलाशाबाबत शासनाने सहमती दर्शविली आहे.

२.७ शासनाकडुन व महामंडळाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने उद्योग विभागाच्या प्रतिनिधींची व महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांची दिनांक २०

सप्टेंबर २००६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, उत्तर दिनांकित धनादेश योजनेअंतर्गत एका समापन प्रक्रियेत असलेल्या एककाला अनियमित सहाय्य व चुकीचे पतमुल्याबाबत तसेच अनधिकृत पत कालावधीत वाढ देण्यात आल्यामुळे अनियमितता होऊन २.८५ कोटी रुपयांचा निधी अडकून पडल्याचे व्यवस्थापकीय संचालकांनी मान्य केले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, काही प्रकरणाच्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई केली असून काही प्रकरणाच्य बाबतीमध्ये अजून काहीही कारवाई केली नाही. कारवाईमध्ये बडतर्फ व निलंबन यासारख्या कारवाईचा समावेश आहे. उत्तर दिनांकित धनादेश योजनेअंतर्गत २२१ युनीट्सना ३७ कोटी रुपयांची अनियमीत मदत करण्यात आली होती. त्यापैकी ८८ युनीट्सकडून ६ कोटी रुपयांचे येणे बाकी आहे. सदरचे प्रकरण ऑडीट पॅरा २.६.४.१.१ शी संबंधीत आहे. ज्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आली त्यांच्याकडून वसूलीबाबत किती प्रतिसाद मिळाला या समितीच्या प्रश्नावर महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी खुलासा केला की, यातून कोणतीही वसूली झालेली नाही. रु. २.८५ कोटीचे नुकसान झाले आहे. तसेच अद्याप काही व्यक्तिविरुध्द कारवाई व्हावयाची आहे.

२.८ **उत्तर दिनांकित धनादेश योजना रु. ५ लाखापेक्षा जास्त -**

१) पतदर्जा संस्था (सीआरए) निवडीचा आधार व पतदर्जाची तपासणी करण्यासाठी वापरण्यात येणारे प्राचल इत्यादि बाबतचा तपशील लेखापरीक्षणाला उपलब्ध करुन देण्यात आला नव्हता. उत्तर दिनांकित धनादेश योजनेतील काही प्रकरणाच्या नमुना तपासणीवरुन असे निदर्शनास आले की, पतदर्जा संस्थेला (सीआरए) पतदर्जाचे मूल्यमापन करण्यात आलेले अपयश व त्याचबरोबर कंपनी कर्मचाऱ्यांनी केलेल्या इतर अनियमितता यामुळे परिच्छेद क्र.२.६.४.१.१ ते २.६.४.१.४ मध्ये चर्चिल्याप्रमाणे वसुलीयोग्य रकमेची वसुली झाली नव्हती. पतदर्जा संस्थेच्या निष्काळजीपणाबाबत कंपनीने त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई केली नव्हती.

२) सीआरएने निर्धारित केलेला पतदर्जा एक वर्षासाठी विधीग्राह्य होता तो त्यानंतर दरवर्षी नवीकृत करावयाचा असतानाही, कंपनीने दोन एककांना सीआरएच्या पतदर्जाला

मुदतवाढ न देता २४ व्यवहारांच्या बाबतीत रु.२०.०७ लाखांची पतसवलत दिली होती. पतदर्जाला मुदतवाढ न देता पतसवलत देण्याची कारणे कागदपत्रावर उपलब्ध नव्हती.

३) कंपनीच्या अटीनुसार वेगवेगळे उत्तर दिनांकित धनादेश मुद्दलासाठी व ९० दिवसापर्यंतच्या व्याजासाठी द्यावयाचे असतांनाही ह्या विरोधात जाऊन दोन एककांनी १७ व्यवहारांबाबत ५ ते १० महिन्याच्या कालावधीसाठी उत्तर दिनांकित धनादेश सादर करताना सुरुवातीच्या तीन महिन्यांच्या व्याजाचे प्रदान केले नव्हते. एककांना देण्यात आलेला अतिरिक्त पत कालावधी २ ते ७ महिने एवढा होता. सादर करण्यता आलेले सर्व उत्तर दिनांकित धनादेश ज्यावेळी प्रदानासाठी बँकेत सादर करण्यात आले होते. तेव्हा पूर्ण रक्कम मिळाली नाही व कराराप्रमाणे जास्त या बँक शेऱ्यासह अनादृत करण्यात आले होते. ३१ मार्च २००२ रोजी या दोन एककांतील थकित रक्कम रु.२५.१२ लाख (मुद्दल : २३.५४ लाख व्याज : रु.१.५८ लाख) एवढी होती. या येण्याच्या वसुलीसाठी ही बाब न्यायालयात होती. (जून २००२).

४) एककांच्या मालक/भागीदार/संचालक यांना द्यावयाच्या व्यक्तिगत हमीच्या विहित नमुना अर्जामध्ये मालमत्तेचा तपशिल सादर करणे, त्यावरील भार त्याची टक्केवारी इत्यादि बाबतचे कलम अंतर्भूत नव्हते. या कलमाच्या अभावामुळे व्यक्तिगत हमी कायदेशीर दिल्या आवाहित करता येत नव्हती त्यामुळे अशी हमी घेण्याचा मूळ उद्देश साध्य झाला नव्हता.

५) कंपनीने एकाकांवर शासनमान्य प्रतिभूती सादर करण्याबाबत आग्रह केला नव्हता. एकाही एककांनी अशा प्रतिभूती सादर केल्या नव्हत्या यावरुन ते स्पष्ट होते.

२.९ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की, संचालक मंडळाची मंजूरी धेऊन पतदर्जा अभिकरणाची नेमणूक करण्यात आली व त्याची नोंद इतिवृत्तांतही धेण्यात आली. लेखापरीक्षणाच्या कालावघीत, लेखापरीक्षकांना कार्यसूची , इतिवृत्तांत आणि तत्सम सर्व कागदपत्रे सादर करण्यात आली होती. पतदर्जा अधिकरणासंदर्भात निवडीचा निकष अशा स्वरुपात होता कि संचालक मंडळाचा इतिवृत्तांत त्याबाबत करण्यात आलेला विचार व मंजूर कार्यवृत्तांत क्र.२७३ संचालक मंडळाच्या सभेचा क्र.२७४ सभेची तारीख

ज्या दिवशी सदरहू सभेमध्ये मंजूरी दिली त्याचा तपशील देण्यात आला. या विवेचनानुसार लेखापरिक्षकांनी परिच्छेदांत जे म्हटले आहे की, संबंधित कागदपत्रे सादर करण्यात आली नाही हे खरे नाही.

मे. ए.एस.टी. पॅकेजिंग मे. सुपर मेटल, औरंगाबाद यांचेविरुध्द महामंडळाने एनआयए च्या १३८ कलमाखाली दिवाणी दावा दाखल केला आहे. न्यायालयामार्फत वसुली करण्याच्या प्रयतनात आहोत. दोन्ही लघुउद्योगांना सल्ला देण्यात आला आहे की, एकाच वेळी सर्व वाद संपुष्टात आणावा.

संचालक मंडळाने मंजुरी दिलेली योजना राबविण्यात आली. लोखंड व पोलाद धंद्यातील प्रमुख उद्योगांशी तसेच व्यावसायिक व्यापाऱ्यांशी स्पर्धा करताना व व्यवसायात रहाण्याकरिता संचालक मंडळाच्या मंजूरीने व्यावसायिक धोका पत्करणे अत्यावश्यक होते. शासकीय हमीपत्रे फार कमी परतावा देतात आणि महामंडळाकडे येणाऱ्या बहुतेक लघुउद्योजकांच्या बाबतीत त्यांना वित्तीय संस्थेकडून मिळणारे अर्थसहयय्य, त्यांच्या खेळत्या भांडवलाची गरज भागवू शकत नाही. यास्तव लघुउद्योगांना श्ांसन स्वीकृत हमी देणे बहुदा शक्य होत नाही. याकरिता, व्यवसायिक संस्था चालविण्याकरिता महामंडळास संचालक मंडळाच्या मंजूरीने व्यावसायिक धोका पत्करुन आणि व्यावसायिक परिस्थितीचे भान ठेवून योजना राबविणे भाग आहे.

२.१० महामंडळाच्या वरील खुलाशाबाबत शासनाने सहमती दर्शविली आहे.

२.११ या संबंधात दिनांक २०/९/२००६ रोजी घेतलेल्या साक्षीच्या वेळीस सांगण्यात आले की, महामंडळाने एककावर शासनमान्य प्रतिभूती सादर करण्याबाबत आग्रह केला नव्हता. एकाही एककांनी अशा प्रतिभूती सादर केल्या नव्हत्या या महालेखाकाराच्या आक्षेपाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी असे म्हटले की, सिक्युरिटी म्हणून निरनिराळे बॉड काढले जातात. केंद्र सरकारने काढलेल्या बॉडची किंमत जास्त असते. व्यवसायीक घोका पत्करुन योजना राबविल्या जातात.

२.१२ **अयोग्य पतमुल्यमापन व एककाला अदेय फायदा -**

सीआरएने गद्रे स्टील खाजगी मर्यादित यांना रु.१.०० कोटीची पतमर्यादा शिफारसीत केली (आक्टोबर १९९९) होती. कंपनीने ऑक्टोबर १९९९ मे फेब्रुवारी

२००० या कालावधीत एककाच्या पुरवठाकाराला कच्चा माल खरेदीसाठी रु.०.५९ कोटीचे अग्रीम प्रदान केले होते.

ऑक्टोबर १९९९ व नोव्हेंबर १९९९ या कालावधीत वेगवेगळ्या वेळी एककाने मार्जिन मनीसाठी दिलेले रुपये १५.०३ लाखांचे धनादेशांचे प्रदान निधी अभावी बँकेने नाकारले होते. त्यानंतर कंपनी, रु.१४.९७ लाख मार्जिन मनी पे ऑर्डरद्वारे वसूल केले होते व थकित रक्कम रुपये ४४.३२ लाख एवढी होती. एककाचा स्टील ॲर्थ्यारिटी ऑफ इंडिया व विक्रम बॅरलस बरोबर थकित येण्याबाबत तंटा होता व विक्रम बॅरलने एककाविरुध्द परिक्राम्य लेख अधिनियमाअंतर्गत दावा दाखल केलेला होता ही बाब कंपनीला माहिती असून (डिसेंबर १९९९) देखील कंपनीने एककाला ३१ जानेवारी व ३ फेब्रुवारी २००० रोजी रुपये १७.९२ लाखांचे पुढील पतकर्ज प्रदान केले होते. एककाने मुद्दल व व्याजासाठी दिलेले उत्तर दिनांकित धनादेश सुध्दा नाकारण्यात आले होते (जून २०००). परिक्राम्य लेख अधिनियमाअंतर्गत फौजदारी दावा दाखल केल्यानंतर (जुलै २०००), एककाने कंपनीला मुद्दल व व्याजासह संपूर्ण प्रदान करण्याबाबत न्यायालयात प्रतिज्ञापनपत्र सादर केले होते. परंतु एककाने दिनांक २३ डिसेंबर २००० ला दिलेला रु.०.५६ कोटीचा धनादेश देखील नाकारण्यात आला होता (डिसेंबर)

लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, एककाने कंपनीकडे पतकर्जासाठी अर्ज करण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (एमएसएफसी) व मुंबई वाणिज्यिक सहकारी बँक मर्यादित (बीएमसीबी) या सारख्या मोठ्या वित्तीय संस्थांच्या कर्जफेड प्रदानामध्ये कसूर केली होती. एककाच्या वैधानिक लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षित केलेल्या १९९७-९९ वर्षाच्या लेख्यांमध्ये एककाने एमएसएफसी व बीएमसीबीकडून घेतलेल्या कर्जाची बाब लपविली होती. एककाला रु.१.०० कोटीची पतमर्यादा मंजूर करताना ही बाब नजरेस आणून देण्यात सीआरएला अपयश आले होते. सीआरएने एककांची मुख्य बँकेकडून (सेंट्रल बँक ऑफ इंडिया) त्यांच्याविरुध्द पतदर्जाबाबत पुष्टी मिळविली नव्हती. कंपनीने सीआरए विरुध्द कोणतीही कारवाई केली नव्हती. अशा रितीने, सीआरएने चुकीचे पतमुल्यमापन केल्यामुळे एककाला अदेय फायदा देण्यात

आला होता व परिणाम स्वरुप रु.०.६२ कोटी (मुद्दल रु.४४.३२ लाख, व्याज रु.१८.१३ लाख) येण्याची वसुली झाली नव्हती.

२.१३ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले की,

पतगुणवत्ता मोजणी संस्थेकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तामापन करण्याचे काम पतगुणवत्ता मोजणी संस्थेचे आहे. त्यानुसार पतगुणवत्ता मोजणी संस्थेने गुणवत्ता मापन केले आहे आणि म्हणून पत गुणवत्ता अजमावणी संस्थेने अजमावण्यात आलेली पत गुणवत्ता दोषार्ह ठरविता येणार नाही. असे दिसून येते की, विभागीय व्यवस्थापक, ठाणे कार्यालय आणि सहाय्यक व्यवस्थापक (कच्चा माल) यांनी संबंधित सर्व कागदपत्रे एकत्रित करुन ती पत गुणवत्ता संस्थेला पाठविण्याकरिता मुंबईच्या कार्यालयाकडे पाठविण्याकरिता योग्य प्रकारे काळजी घेतली नाही. महामंडळाने अद्यापपर्यंत मे. गद्रे यांजकडून रु.४४.०० लाख वसुल केले आहेत. मे. गद्रे यांनी ह्या प्रकरणी एकत्रितरित्या बैठक घेऊन शिल्लक रक्कम एकाचवेळी भरण्याची तयारी दर्शविली आहे व म्हणून ही बाब संपुष्टात येईल.

२.१४ महामंडळाच्या वरील खुलाशाबाबत शासनाने सहमती दर्शविली आहे.

२.१५ समितीने दि.२०/९/२००६ रोजी यासंबंधात घेतलेल्या साक्षीच्यावेळी सी.आर.ए.ने गद्रे स्टील खाजगी मर्यादित यांना १ कोटीची पतमर्यादा धोरणाची शिफारस केली होती. कंपनीने ऑक्टोबर १९९९ ते फेब्रुवारी २००० या कालावधीत एककाच्या पुरवठाकाराला कच्चा माल खरेदीसाठी ५० लाख रुपयांचे अग्रीम प्रदान केले होते. या संबंधातील उत्तर देतांना महाव्यवस्थापकीय संचालकांनी विशद केले की, गद्रे स्टील खाजगी मर्यादित या कंपनीकडून ५९ लाख येणे होते.त्यापैकी महामंडळाने ४४ लाख रुपये वसुली केली आहे. उर्वरित रक्कम अदा करण्यात येईल असे कंपनीने सांगितले आहे. या प्रकरणी विभागीय व्यवस्थापक, ठाणे कार्यालय आणि सहाय्यक व्यवस्थापक (कच्चा माल) यांनी सर्व संबंधीत कागदपत्रे एकत्रित करुन ती पत गुणवत्ता संस्थेस पाठविण्याकरिता योग्य प्रकारे काळजी घेतली नाही व ह्या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येईल. तथापि, प्रकरण २००२ पासून

आतापर्यंत प्रलंबित आहे. कोणतीही कारवाई करण्यात आली नाही ही बाब समितीने महामंडळाच्या निदर्शनास आणून दिली.

२.१६ **<u>अभिप्राय व शिफारशी :-</u>**

पात्रता आणि पुरवठ्याचे मार्ग यासाठी लघुउद्योग एकके सर्व प्रकारच्या कच्च्या मालांसाठी या सवलतीचा फायदा घेऊ शकत होते. फक्त त्यासाठी त्यांनी कंपनीशी सल्लामसलत करुन लिखित मागणी पत्र व पुरवठ्याचा मार्ग निश्चित करुन त्यासाठी बँकेची हमी/पतपत्र किंवा इतर प्रकारची सुरक्षा द्यावयाची होती. या संदर्भात पुरवठा व्यवस्था करण्यासाठी एका लघुउद्योग एककाकडून मिळालेल्या निश्चित मागणी पत्राच्या आधारावर कमीत कमी मात्रेसाठी कच्च्या मालाच्या पुरवठ्याची सरळ पोहचवणी तत्त्वावर व्यवस्था करावयाची होती. अशा एका दिनांकित धनादेश योजनेअंतर्गत एका समापन प्रक्रियेत असलेल्या एककाला अनियमित सहाय्य, चुकीचे पतमूल्यमापन व एककाना अनधिकृत पत कालावधीत वाढ देणे या बाबी दिसून आल्या. त्यामुळे रु.२.८५ कोटीचा निधी अडकून पडला. लेखी उत्तरात हा आक्षेप महामंडळाने पूर्णत: मान्य केला आहे आणि शासनाने त्याची सहमती दर्शविली आहे. याप्रकरणी साक्षीच्यावेळी सांगण्यात आले की, या प्रकरणी काही संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली असून काही प्रकरणाच्या बाबतीमध्ये अजूनही कारवाई केलेली नाही. कारवाईमध्ये बडतर्फ व निलंबन अशा कारवाईचा समावेश आहे. परंतु कारवाई करण्यात आली त्यांच्याकडून अद्याप रक्कम वसूल होण्याबाबत कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. तसेच ही कारवाई केवळ या एकाच आक्षेपाबाबत नाही तर अशाच प्रकारच्य इतरही काही आक्षेपाबाबत करण्यात आलेली आहे. त्यामुळे कारवाई झालेल्या व्यक्तिकडून वसूल व्हावयाची रक्कम आणखी वाढली आहे. शिवाय गेल्या ५-६ वर्षात कांही व्यक्तिविरुध्द महामंडळाने कारवाई केलेलीच नाही. त्यांच्याविरुध्द यापुढे कारवाई करण्यात येणार आहे असे साक्षीच्या वेळी सांगण्यात आले. जर समितीने यासंबंधात महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली नसती तर यापुढे काही जणांविरुध्द करावयाच्या कारवाईचा संबंधच राहिला नसता आणि कारवाई करण्यात येईल असे साक्षीत सांगूनही कोणती कारवाई करण्यात येणार व त्यामुळे झालेले नुकसान भरुन निघणार

काय याबाबत समिती साशंक आहे. जर महामंडळाला कारवाई करावयाचीच होती तर एवढा मोठा कालावधी जाऊनही कोणतीही कारवाई का करण्यात आली नाही असा प्रश्न निर्माण होतो. महामंडळाच्या अशा वागण्याचे अनेक अर्थ निघू शकतात. म्हणूनच महामंडळाचे नुकसान/तोटा वाढत आहे हे सर्व विचारात घेता समिती स्पष्टपणे अशी शिफारस करीत आहे की, अशा पध्दतीने तोट्यात आणणाऱ्या योजना एकतर महामंडळाने बंद कराव्यात आणि जर अशा योजना चालू ठेवावयाच्या असतील तर अशा योजनांमधील पळवाटा शोधून काढून संगनमताने महामंडळास आर्थिक नूकसानीत ढकलले जाणार नाही याची खबरदारी घेऊन अतिशय सक्षमतेने योजना अंमलात आणाव्यात. जे अधिकारी अधिकाराचा गैरवापर करुन संगनमताने महामंडळाच्या नुकसानीस कारणीभूत ठरतील त्यांच्यावर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी व त्यांच्याकडून झालेल्या नुकसानीची पूर्णपणे वसुली करुन घ्यावी व आवश्यक भासल्यास **त्यांना महामंडळाच्या सेवेतून त्वरीत दूर करावे. या प्रकरणीसुध्दा ज्या अधिकाऱ्यांनी महामंडळास तोटा होण्यास हातभार लावला आहे अशा सर्वांकडून तोट्याची वसूली करुन घ्यावी आणि ज्यांच्याविरुध्द कारवाई करावयाची बाकी आहे अशा सर्वांची चौकशी करुन त्यांचेविरुध्द कडक कारवाई करावी. यासंबंधात केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा.**

अशाच प्रकारची आणखी दोन प्रकरणे आहेत, त्यापैकी एका प्रकरणात उत्तर दिनांकित धनादेश योजनेतील नमुना तपासणीवरुन असे दिसून आले की, पतदर्जा संस्थेला पतदर्जाचे मूल्यमापन करण्यात आलेले अपयश व कंपनी कर्मचाऱ्यांनी केलेल्या इतर अनियमितता यामुळे वसूलीयोग्य रकमेची वसूली झाली नाही. पतदर्जा संस्थेच्या निष्काळजीपणाबाबत कंपनीने त्यांच्यविरुध्द कोणतीही कारवाई केली नव्हती. यामुळे कंपनीची रु.२५.१२ लाख एवढी रक्कम थकीत होती. या वसूलीसाठी ही बाब न्यायालयात आहे. महामंडळाने लेखी खुलाशात म्हटल्याप्रमाणे, व्यवसायिक संस्था चालविण्याकरिता महामंडळास संचालक मंडळाच्या मंजूरीने व्यवसायिक धोका पत्करुन व व्यवसायिक परिस्थितीचे भान ठेवून योजना राबविणे भाग आहे हे जरी खरे असले तरीही ज्या लघुउद्योजकांच्या बाबतीत असा धोका पत्करावयाचा आहे त्याचा

पूर्वोइतिहास प्रथम पाहिला पाहिजे. जर अशा लघुउद्योजकाने पूर्वी कोणाची फसगत केलेली असेल, त्याच्या वर्तणूकीबाबत संशय असेल तर धोका पत्करण्यात कोणताही फायदा नाही असेच समितीचे मत आहे. ज्या रकमेबाबत धोका पत्करावयाचा आहे ती रक्कम सार्वजनिक मालमत्ता म्हणजे जनतेच्या करातून गोळा झालेली आहे. जर ही रक्कम व्यक्तिगत स्वरुपात असेल तर ती व्यक्ती स्वत:ची रक्कम बुडण्याबाबत असा धोका पत्करेल काय ? तेंव्हा संचालक मंडळाने व महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी प्रथम असा विचार करावा की त्यांच्यावर महामंडळाच्या आर्थिक हिताची जबाबदारी सोपविण्यात आली असल्याने ती त्यांची स्वत:ची रक्कम समजून ती कशी वसूल होईल व महामंडळाने नुकसान होणार नाही याची काळजी प्रथम घ्यावी. म्हणजेच लघुउद्योजकाची अनेक कसोट्यांवर सखोल चाचणी करावी व त्यानंतरच निर्णय घ्यावा. शिवाय समितीचे असेही मत आहे की, ज्या लघुउद्योजकाच्या बाबतीत असा धोका पत्करावयाचा आहे त्यांच्याकडून व्याजासह रक्कम वसूल होण्याच्या दृष्टीने एक करारपत्र (अंडरटेकींग) सुध्दा करुन घेण्यात यावे म्हणजे रक्कम बुडण्याचा धोका राहणार नाही. जरी न्यायालयात जाण्याची वेळ आली तरी सर्व रक्कम व्याजासह वसूल करता येईल म्हणून समिती अशी शिफारस करीत आहे की, **संचालक मंडळ व महामंडळाचे अधिकारी यांनी नियमात सुधारणा करुन ज्या लघुउद्योजकांच्या बाबतीत असा धोका पत्करावयाचा आहे त्याची अनेक कसोट्यांवर चाचणी करुनच निर्णय घ्यावा की, जेणेकरुन रक्कम वसूल होईल. शिवाय अशा लघुउद्योजकांकडून व्याजासह रक्कम वसूल होण्याच्या दृष्टीने एक करारपत्र (अंडरटेकींग) करुन घ्यावे जेणेकरुन न्यायालयामार्फतही व्याजासह संपूर्ण रक्कम वसूल होईल व महामंडळाचे नुकसान होणार नाही. या प्रकरणी कंपनीची रु. २५.१२ लाख एवढी रक्कम वसूल होणे साठी प्रकरण न्यायालयात आहे. परंतु ज्या कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे हे प्रकरण घडले त्या सर्व कर्मचाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करण्यात यावी. याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा.**

या समितीने आतापर्यात सिडको, महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ, महाराष्ट राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक

विकास महामंडळ अशा महामंडळांच्या कामकाजाची तपासणी केली असता, समितीला स्पष्टपणे असे दिसून आले की, जवळ-जवळ सर्व महामंडळांची कित्येक कोटी रुपयांची रक्कम अडकून पडल्याची अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयापुढे प्रलंबित आहेत. त्यांचा निकाल लागेपर्यंत बहूतांश प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी सेवानिवृत्त होतात. त्यामुळे त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात अडचणी निर्माण होतात. त्याशिवाय निकाल लागेपर्यंत व्याजापोटी करोडो रुपयांचे नुकसान होते व आणि खेळत्या भांडवलाची महामंडळांना कमतरता भासते. महामंडळास आर्थिक नुकसान सहन करावे लागते. हे सर्व विचारात घेता न्यायालयीन प्रकरणे लवकरात लवकर कशी निकालात काढता येतील याचा महामंडळाने तसेच शासनाने विचार करणे अत्यंत आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. यावर उपाय म्हणजे एकतर प्रथमतःच प्रकरण न्यायालयात जाणार नाही अशी तजविज करुन ठेवणे किंवा न्यायालयात गेलेल्या प्रकरणाचा कसोशिने पाठपूरावा करणे. या दोन्ही बाबतीत सतर्कता बाळगली जात नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे या परिस्थितीत कशा प्रकारे सुधारणा करता येईल याचा, आवश्यकता तज्ञांच्या सल्लामसलतीने विचार करण्यात यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

अशा प्रकारच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये अयोग्य पतमुल्यमापनामुळे एककाला अदेय फायदा असा प्रकार आहे. पतदर्जा संस्थेने गद्रे स्टील खाजगी मर्यादित यांना रु. १.०० कोटीची पतमर्यादा शिफारस केली होती. महामंडळाने ऑक्टोबर १९९९ ते फेब्रुवारी २००० या कालावधीत एककाच्या पुरवठाकाराला कच्चा माल खरेदीसाठी रु.०.५९ कोटीचे अग्रीम प्रदान केले होते. उपरोक्त कालावधीत एककाने मार्जीनमनीसाठी दिलेले रु.१५.०३ लाखांचे धनादेश निधीअभावी बँकेने नाकारले होते. म्हणून महामंडळाने पे ऑर्डरद्वारे रु.१४.९७ लाख वसूल केले होते. परंतु रु.४४.३२ लाख रक्कम थकीत राहिली. तरीही पुन्हा एककाला रु. १७.९२ लाखाचे दुसरे पतकर्ज प्रदान केले. एककाने दिलेले व्याज व मुद्दलापोटीचे उत्तर दिनांकित धनादेश बँकेने नाकारले होते. एककाने १९९७-९९ मध्ये दोन वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची व त्यात कसूर केल्याची बाब लपविली होती. एककाला १ कोटी पतमर्यादा

मंजूर करताना पतदर्जा संस्थेने कागदपत्रांची योग्य प्रकारे छाननी न करता गुणवत्ता मापन केले तरीही त्या संस्थेबाबत, "अजमावण्यात आलेली पत गुणवत्ता दोषार्ह ठरविता येणार नाही" असा अभिप्राय लेखी खुलाशात व्यक्त केलेला आहे. श्री. गद्रे स्टील्स यांच्याकडून रुपये ४४ लाख वसूल करण्यात आल्याचे साक्षीच्यावेळी सांगण्यात आले आहे. परंतु मुळातच हे प्रकरण घडण्यामागे महामंडळाचे अधिकारीच जबाबदार असल्याचे समितीचे मत आहे. यामध्ये विभागीय व्यवस्थापक, ठाणे कार्यालय आणि सहाय्यक व्यवस्थापक (कच्चा माल) यांनी सर्व संबंधित कागदपत्रे एकत्रित करुन ती पत गुणवत्ता संस्थेस पाठविण्याकरिता योग्य प्रकारे काळजी घेतली नाही. या दोन अधिकाऱ्यांनी गद्रे स्टील कंपनीशी संगनमत करुन हे सर्व केल्याचा दाट संशय समितीस येत आहे. म्हणून हे दोन अधिकारी या प्रकरणी पूर्णपणे दोषी आहेत असा समिती निष्कर्ष काढते. महामंडळे अशा अधिकाऱ्यांमुळेच आर्थिक संकटात सापडतात. महामंडळाने या दोन दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे साक्षीच्या वेळी समितीला आश्वासन दिलेले आहे. म्हणून या प्रकरणी समिती अशी शिफारस करते की, या दोन अधिकाऱ्यांची या प्रकरणाचे अनुषंगाने चौकशी करुन त्यांचेवर जवाबदारी निश्चित करावी व महामंडळाचे झालेले नुकसान भरुन काढण्याच्यादृष्टीने महामंडळाने पाऊले उचलावित. व अशाच प्रकारची प्रकरणे पुन्हा घडणार नाहीत यादृष्टीने महामंडळाने सतर्कता बाळगावी व गद्रे स्टील कंपनीने थकित रक्कम देण्यात येईल असे आश्वासन दिल्याचे साक्षिचेवेळी सांगण्यात आले आहे. त्याची पूर्तता त्यांचेकडून केली जाईल या दृष्टिने महामंडळाने पाठपूरावा करावा. या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी.

**तीन - रुपये ५ लाखापर्यंत उत्तर दिनांकित धनादेश योजना -**

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००१-२००२ च्या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेद क्रमांक २.६.४.२ मध्ये "रुपये ५ लाखापर्यंत उत्तर दिनांकित धनादेश योजना " या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

रुपये ५ लाखापर्यंतची उत्तर दिनांकित धनादेश योजना विभागीय पातळीवर कार्यान्वीत होत होती व एककांना पतसवलत संबंधित विभागीय व्यवस्थापक /स्टॉकयार्ड व्यवस्थापक मंजूर करत होते.

या आधी नमूद केलेल्या (परिच्छेद २.६.३.१) सर्वसाधारण अटी व्यतिरिक्त या योजनेच्या महत्त्वाच्या शर्थी व अटी खालीलप्रमाणे होत्या :-

* दोन पीडीसीज (उत्तर दिनांकित धनादेश) घ्यावयाचे होते संपूर्ण मालाची किंमत असलेला मुद्दलाचा एक व दूसरा व्याजासाठी.
* पहिल्या व्यवहाराचे संपूर्ण प्रदान (मुद्दल अधिक व्याज) वसूल झाल्याशिवाय दुसऱ्या व्यवहाराची पतसवलत एककाला द्यावयाची नव्हती.
* एककाने मालाच्या किंमतीची १५ टक्के रक्कम मार्जिन मनी म्हणून द्यावयाची होती.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, कंपनीने महत्त्वाच्या अटीपासून विचलन केले होते त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

१) कंपनीने एका एककाच्या रुपये ८.३८ लाखाच्या चार बीजकांसाठीचे पीडीसीज घेतले नव्हते. त्या एककाकडून ३१ मार्च २००२ रोजी एकूण थकित रक्कम रुपये ७.५५ लाख एवढी होती.

२) कंपनीच्या योजनेनुसार आधिच्या व्यवहाराचे पूर्णपणे तडजोडीत झाल्याशिवाय दुसरा व्यवहार न करण्याच्या विरोधात जाऊन कंपनीचे १५ लघुउद्योगांना त्या ४१ बिजकांच्या बाबतीत रुपये ०.७२ कोटीची पतसवलत दिली होती याबाबत ३१ मार्च २००२ रोजी थकित रक्कम रुपये ०.८३ कोटी (मुद्दल रुपये ०.७२ कोटी, व्याज रुपये ११ लाख) एवढी होती.

३) कंपनीने दोन एककांकडून पतसवलत देण्यापूर्वी रुपये ९.८० लाखाचा मार्जिन मनी वसूल केला नव्हता. या दोन एककांकडून ३१ मार्च २००२ रोजी थकित असलेली रक्कम रुपये १२.३२ लाख (मुद्दल रुपये ९.८० लाख व्याज: रुपये २.५२ लाख एवढी होती.

४) कंपनीच्या औरंगाबाद व पुणे येथील विभागांनी तीन एककांना प्रत्येक प्रकरणात रुपये ५ लाखापेक्षा जास्त पतमर्यादा त्याच दिवशीच बिलांचे निपटान करुन दिली होती. याबाबत मुख्यालयाकडून मान्यताही मिळविण्यात आली नव्हती किंवा सीआरए मार्फत त्या एककांचा पतदर्जा देखील निर्धारित करण्यात आला नव्हता.

या प्रकरणामध्ये एककांचा अदेय फायदा करुन देण्यात आला होता व त्यामध्ये जाणीवपूर्वक निष्काळजीपणाची शक्यता नाकारता येत नव्हती.

३.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने असे नमूद केले की, या प्रकरणी न्यायालयाबाहेर तोडगा काढण्याकरिता महामंडळ प्रयत्नशील आहे. अहवालात नमूद केलेली स्थिती सत्य आहे. तथापि, मे. वैभव इंडस्ट्रिज, औरंगाबाद यांच्याकडून तातडीने रक्कम वसूल करण्याकरिता पाठपूरावा करीत आहोत. सदर लघुउद्योगाने विभागीय व्यवस्थापक, औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधला आहे आणि त्यांच्याकडून तडजोडीने एकरकमी भरणा करण्याचा प्रस्ताव येण्याची शक्यता आहे. मे.सूर्या प्लॅस्टिक आणि मे.टॅको फास्टनर ह्या लघुउद्योगाने विभागीय व्यवस्थापक, औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधून त्यांना आश्वासन दिले आहे की, महामंडळाच्या एकाच वेळी रक्कम चुकती करण्याच्या योजनेनुसार प्रस्ताव सादर करीत आहोत. न्यायालयीन हुकुमनाम्यानुसार मे.टॅको कडून महामंडळाकडे १५ दिवसापर्यंत रक्कम जमा होईल. मे.टॅको फास्टनर, मे. रघुनंदन फिट ॲण्ड फोर्ज आणि मे.एस.डी.फॅब्रिकेटर्स ह्या लघुउद्योगांनी विभागीय व्यवस्थापक, औरंगाबाद ह्यांच्याशी संपर्क साधून आश्वासन दिले आहे की, महामंडळाच्या एकाच वेळी रक्कम चुकती करण्याच्या योजनेखाली प्रस्ताव सादर करीत आहोत. मे. टॅको संदर्भात

न्यायालयाने दिलेल्या हुमुमनाम्यानुसार महामंडळाकडे १५ दिवसांच्या आत रक्कम जमा होईल अशी अपेक्षा आहे.

३.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

३.४ शासनाकडून व महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने उद्योग विभागाचे प्रतिनिधींची व महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांची दिनांक २० सप्टेंबर २००६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, महामंडळाच्या औरंगाबाद व पुणे येथील विभागांनी तीन एककांना प्रत्येक प्रकरणात रुपये पाच लाखापेक्षा जास्त पतमर्यादा त्याच दिवशीच बिलांचे निपटाण करुन दिली होती. याबाबत मुख्यालयाकडून मान्यताही मिळविण्यात आली नव्हती किंवा सीआरए मार्फत त्या एककांचा पतदर्जा देखील निर्धारित करण्यात आला नव्हता. या प्रकरणामध्ये एककाचा अदेय फायदा करुन देण्यात आला होता व जाणीवपूर्वक निष्काळजीपणे व्यवहार करण्यात आले होत.े या महालेख्ाकारांच्या मुद्याबाबत विषद करताना महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, या प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी लागेल. समितीने याबाबत होत असलेल्या दिरंगाईबाबत नाराजी व्यक्त केल्यावर महाव्यवस्थापकांनी सांगितले की, याबाबत त्वरित जबाबदारी निश्चित करुन संबंधीतांवर कारवाई करण्यात येईल व कर्जाच्या वसूलीबाबत देखील कार्यवाही केली जाईल.

**३.५ <u>अभिप्राय व शिफारशी :-</u>**

या परिच्छेदात महालेखापरिक्षकांनी नमूद केलेली सर्व परिस्थती सत्य असल्याचे महामंडळाने कबूल केलेले आहे. महामंडळाने घातलेल्या महत्त्वाच्या अटी व शर्थी यापासून विभागीय पातळीवरील अधिकाऱ्यांनी पूर्णपणे फारकत घेऊन मनमानीपणे व निष्काळजीपणे सर्व व्यवहार केले होते व एककांचा अदेय फायदा करुन देण्यात आला होता. महालेखापरिक्षकांनी त्याच्या परिच्छेदातील क्र. १ ते ३ मध्ये विषद केल्याप्रमाणे अनुक्रमे रु.७.५५ लाख,८३ लाख व १२.३२ लाख एवढी रक्कम थकित झाली होती. हे सर्व व्यवहार सरसकट नियमांचे उल्लंघन करुन करण्यात आले होते. ही रक्कम वसूल होईल अशी महामंडळाला अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच या

सर्व प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येईल असे साक्षीच्या वेळी सांगण्यात आले आहे. तसेच याप्रकरणी दिरंगाई झाल्याचेही त्यांनी मान्य केले आहे. ही सर्व परिस्थिती विचारता घेता समिती या संबंधात अशी शिफारस करते की, ज्या अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा दाखविल्यामुळे महामंडळाची १ कोटीपेक्षा जास्त रक्कम थकीत होऊन ती वसूल करणे कठीण झाले आहे अशा सर्व अधिकाऱ्यांवर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी.व त्यांचेवर कडक कारवाई करावी.

या प्रकरणासंबंधात एकरकमी भरणा करण्याची तयारी काहींनी दाखविली आहे असे समजते.समितीच्या मते ही त्यातल्या-त्यात समाधानाची बाब आहे. यामूळे काही अंशी का होईना पण महामंडळाचे नूकसान भरुन येईल. त्यामुळे महामंडळाने या उद्योजकांकडे पाठपूरावा करुन जास्तीत जास्त रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न करावा. या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

**चार : कच्चा मालाच्या खरेदीसाठी वखारपालन कार्यासह पतसवलत योजना व नागपूर येथील मेहता समुहाच्या कंपन्यांनी अनधिकृतरित्या काढलेला मालसाठा -**

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००१-२००२ च्या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेद क्रमांक २.६.५ व २.६.५.१ मध्ये अनुक्रमे कच्चा मालाच्या खरेदीसाठी वखारपालन कार्यासह पतसवलत योजना"व "नागपूर येथील मेहता समुहाच्या कंपन्यांनी अनधिकृतरित्या काढलेला मालसाठा" या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

**कच्च्या मालाच्या खरेदीसाठी वखारपालन कार्यासह पतसवलत योजना -(२.६.५)-**

कंपनीने एकदम मोठ्या परिमाणामध्ये (२० टन व त्याहून अधिक) कच्चा माल खरेदी करुन त्या परिमाणाची किंमत एकाच हप्त्यात न भरु इच्छिणाऱ्या लघुउद्योग एककांच्या फायदयासाठी ही योजना सुरु (ऑक्टोबर १९९५) केली होती. योजनेच्या महत्त्वाच्या शर्ती व अटी खालीलप्रमाणे होत्या -

अ) मागणी केलेल्या कच्च्या मालाच्या किंमतीच्या २० टक्के एवढा मार्जिन मनी एककाला भरावयाचा होता.

ब) मालाच्या किंमतीच्या उर्वरित ८० टक्के रक्कम व हाताळणीखर्च व व्याज भरल्यानंतर एककांच्या आवश्यकतेनुसार कच्च्या मालाची पोहचवणी छोट्या छोट्या भागात (लॉटस्) करावयाची होती.

क) एककाला त्यांनी उपभोगलेल्या पतकालावधीसाठी लागू असलेल्या दराने व्याज त्या पतकालावधी टप्प्यासाठी आगाऊ भरावयाचे होते. जर एककाकडून विशिष्ट विनंती केली गेली तर खालील अटीच्या आधारावर देय रक्कमेच्या परतफेडीचा कालावधी वाढवून द्यावयाचा होता :-

१) एकाकाला गोदामामध्ये पडून असलेल्या मालाच्या किंमतीच्या १० टक्के एवढा अतिरिक्त मार्जिन मनी भरावयाचा होता.

२) जर संपूर्ण माल वाढवून दिलेल्या पतकालावधीत उचलण्यात एककाला अपयश आले तर कंपनीने एककाच्या जोखीम व किंमतीवर त्या मालाची विल्हेवाट लावायची होती.

ही योजना सुधारित करण्यात आली (जानेवारी १९९७) ज्या अन्वये कच्च माल जो कंपनीच्या गोदामात साठविला जात होता तो एककांच्या गोदामात साठविला जाणार होता. त्यामुळे एककाचा वाहतुकीवर व माल चढविणे उतरविणे यावर होणारा अतिरिक्त खर्च कमी होणार होता व मालाची पोहचवणी वेळेवर होण्याची खात्री हाती. कंपनीने एककांच्या गोदामावर मालाच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावयाची होती व त्याचा खर्च एककाने सोसायचा होता.

परंतु लेखापरीक्षण छाननीत असे आढळून आले की, एककांच्या सुरक्षिततेबाबतची खात्री करुन न घेताच वखार कार्य मूळ योजनेपासून विचलित होऊन राबविल्यामुळे एककाने अनधिकृतरित्या गोदामातून मालसाठा काढून घेतला होता व त्याबाबतची वसुली करण्यात आली नव्हती.

४.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने असे नमूद केले की, सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी लक्षात आल्यानंतर महामंडळाने संबंधित सुरक्षा कंपनीविरुध्द आणि त्या संचालकाविरुध्द कामटी पोलिस स्टेशनात गुन्हा दाखल केला आहे. गोदाम सेवा व पत योजना सवलतीनुसार कच्चा मालाची खरेदी करण्याच्या योजनेत सुधारणा करताना, संचालक मंडळाने दिलेल्या मंजूरीव्यतिरिक्त यंत्रणेत त्रुटी होती.

४.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

४.४ नागपूर येथील मेहता समुहाच्या कंपन्यांनी अनधिकृतरित्या काढलेला मालसाठा (२.६.५.१) कंपनीच्या नागपूर विभागीय कार्यालयाने वखारकार्य पतसवलत योजनेअंतर्गत १९९६-९९ या कालावधीत मेहता कंपनी समुहाच्या ५ संलग्न एककांना रुपये ३२.५१ कोटीचे सहाय्य कच्चामालाच्या विक्रीमार्फत दिले होते.

या कालावधीत, या उद्योग समूहांची थकित बाकी रुपये ८.२३ कोटी एवढी होती व डिसेंबर १९९७ मध्ये संपादन केलेले रुपये २.४० कोटीचा १,८०९.२४ मे.टनाचा मालसाठा ९० दिवसाचा पतकालावधी (मार्च १९८८) उलटून गेला तरी उचलला नव्हता. समुहाकडे असलेली थकित बाकी व व्यवस्थापकीय संचालकांनी जारी केलेले निर्देश विचारात घेऊन मुख्य व्यवस्थापक (कच्चा माल) यांनी विभागीय व्यवस्थापक, नागपूर

यांना या समुहासाठी नवीन माल खरेदी न करण्याचे निर्देश दिले होते. परंतु या निर्देशांची उपेक्षा, करुन विभागीय व्यवस्थापक, नागपूर यांनी समुहाच्या वतीने रुपये ४.१७ कोटी किंमतीचा ३०४२ टनाचा लोखंड व पोलाद मालसाठा खरेदी केला (मार्च /एप्रिल १९९८) होता व त्यापैकी समुहाने रुपये १.३३ कोटी किंमतीचा ९७०.५५ मे.टन मालसाठा उचलला नव्हता. पतकालावधी समाप्त झालेला असतानाही समुहाने न उचललेल्या एकूण माल २,७७९.७९ मे.टन एवढा होता.

कंपनीने नियुक्त केलेल्या सुरक्षा संस्थेने नोव्हेंबर १९९९ मध्ये अहवाल दिला की त्या समुहाने एककाच्या गोदामामधून अनधिकृतरित्या रुपये ३.७३ कोटी किंमतीचा मालसाठा (२७७९.७९ मे.टन) काढून नेला होता. कंपनीने अनधिकृतरित्या मालसाठा काढून घेण्याबाबत पोलीसांत तक्रार केली (३१ जानेवारी २०००). त्याचे परिणाम अद्याप (मार्च २००२) प्रलंबित होते. ३१ मार्च २००२ रोजी या उद्योग समुहाकडे थकित रक्कम रुपये ९.९५ कोटी (मुद्दल रुपये ४.८२ कोटी, व्याज रुपये ५.१३ कोटी) एवढी होती.

लेखापरिक्षण्ांत निदर्शनास आले की,

१) या समूहासाठी कोणताही नवीन माल संपादन करण्यात येऊ नये अशा मुख्यालयाच्या विनिर्दिष्ट सुचनांच्या (फेब्रुवारी १९९८) विरोधात जाऊन नागपूर विभागाने मालाचे संपादन केले होते. विभागीय व्यवस्थापकाने प्रत्यायुक्त केलेल्या रुपये १० लाख अधिकारापेक्षा जास्त मालाचे संपादन केले होते.

२) या समुहाने पतकालावधी संपून गेल्यानंतर देखील मालसाठा उचलला नव्हता तरी विभागाने तो मालसाठा समुहाच्या किंमत व जोखमीवर विल्हेवाटीत केला नव्हता. ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी वाढवून दिलेल्या पतकालावधीसाठी १० टक्के अतिरिक्त मार्जिन मनी म्हणून रुपये १.०६ कोटी समुहाकडून वसूल करण्यात विभागाला अपयश आले होते. एवढा मोठा मालसाठा काढून घेतला होता व गोदामाच्या किल्ल्या विभागीय कार्यालयाच्या ताब्यात असतांनाही त्याबाबत विभागीय कार्यालय पूर्णपणे अनभिज्ञ होते. विभागीय कार्यालयाच्या किंवा मुख्यालयाच्या एकाही कर्मचाऱ्यांने या समुहाने मालसाठा काढून घेण्याबाबत सुरक्षा

संस्थेला कोणताही प्रश्न विचारला नव्हता. कंपनीने एककाच्या गोदामामध्ये साठविलेला मालसाठा कंपनीच्या प्रतिनिधींच्या समक्ष व कंपनीकडून त्याबाबत लेखी अधिकारपत्र प्राप्त झाल्यावरच काढावयाचा होता. याबाबत सुरक्षा रक्षकांना कोणत्याही सूचना जारी केल्या नव्हत्या.

३) विभागीय कार्यालयाने रुपये ४२.७९ लाख किंमतीचा ३०६ मे.टनाचा मालसाठा (पोलाद व लोखंड) गहाळ असल्याबाबत वेगळी पोलीस तक्रार दाखल केली होती (फेब्रुवारी २०००). अशा रितीने उद्योग समुहाने अनधिकृतरित्या काढून घेतलेला मालसाठा ३,०८५.७९ मे.टन किंमत रुपये ४.१६ कोटीचा होता व त्यासाठी कंपनीकडे कोण्ंतीही सुरक्षा ठेव नव्हती. पोलीस तपासाचे निष्कर्श प्रलंबित होते (मार्च २००२).

कंपनीने तपासणी अधिकारी नियुक्त (ऑक्टोबर २०००) केला होता. ज्याने अहवाल दिला होता (डिसेंबर २०००/फेब्रुवारी २००१) की या निष्काळजीपणासाठी मुख्यालयाचे दोन व विभागीय कार्यालयाचे चार अधिकारी जबाबदार होते. कंपनीने तीन अधिकाऱ्यांना निलंबित केले होते परंतु तपासणी अहवालात स्पष्ट दोषारोप केलेल्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालकाविरुध्द (श्री.ए.एन.शेट्टी) कोणतीही कारवाई केली नाही.

४.५ शासनाने व महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाने समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने असे नमूद केले की, महामंडळाने कामटी पोलीस ठाण्यात कंपनी आणि तिच्या संचालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हा अन्वेषण विभागामार्फत सुरु आहे.

नागपूर विभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली. हे कर्मचारी म्हणजे श्री.ए.आर.वैरागडे, तत्कालीन विभागीय व्यवस्थापक, नागपूर कार्यालय, ज्यांना महामंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले. श्री. व्ही.व्ही. जिंतूरकर यांना महामंडळाच्या सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले. श्री. दाहेदार ह्यांनी ५ वर्षाकरिता वार्षिक वेतनवाढ रोखण्यात आली. श्री. सुमनवार ह्यांना महामंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले. श्री. ए.जे. काळे, प्रमुख (कच्चा माल)

ह्यांना सुध्दा महामंडळाच्या सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले. श्री. पाटणकर, कामगार सल्लागार यांनी दिलेल्या अहवालाआधारे श्री. ए.एन. शेट्टी तत्कालिन सह व्यवस्थापकीय संचालक यांच्याविरुध्द काहीही कारवाई करण्यात आली नाही. व्यवस्थापनाने विभागीय व्यवस्थापक, नागपूर यांना कळविले आहे की, कलम १५६ (३) अन्वये फौजदारी खटला करता येईल काय या बाबत पोलीस खात्यात चौकशी करुन पुढील कारवाई कशी करता येईल याबाबत विचारणा करण्यात यावी. ह्या बाबतीत गुन्हा अन्वेषण विभागाकडून अहवाल अपेक्षित आहे.

४.६ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

४.७ शासनाच्या व महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाच्या लेखी खुलाशावर समितीने दि. २०सप्टेंबर २००६ रोजी शासनाच्या व महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी व्यवस्थापकीय संचालकांनी विशद केले की, संबंधीत युनीट विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच विभागीय सचिवांनी देखिल सांगितले की, या संदर्भात फौजदारी गुन्हा दाखल करुन केस गुन्हा अन्वेषण विभागाकडे तपासासाठी देण्यात आली आहे.

४.८ **अभिप्राय व शिफारशी :-**

लेखापरिक्षणात आलेला हा मुद्दा महामंडळाने पूर्णपणे मान्य केलेला आहे. त्यानुसार काही संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. परंतु झालेल्या नुकसानीची वसुली करण्यात महामंडळ पूर्णपणे अपयशी ठरले आहे. या प्रकरणात संयुक्त व्यवस्थापकीय संचालकाविरुध्द मात्र कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही हेच सहव्यवस्थापकीय संचालक (श्री. शेट्टी) परिच्छेद २.६.७ प्रमाणे - "अस्तित्वात असलेल्या कोणत्याही योजनांच्या व्याप्रीत नसलेली विलक्षण पतसवलत" यामध्येही समितीला दोषी असल्याचे आढळून आले आहे. त्याप्रकरणीही समितीने कडक शिफारस केली आहेच. या प्रकरणात रु.४.१६ कोटींचे नुकसान झालेले आहे. समितीच्या मते हे नुकसान वसुल होणे आवश्यक आहे. अशाच प्रकारच्या अन्य दोन प्रकरणात दोषी असणारे तत्कालीन सहव्यवस्थापकीय संचालक हे २००० साली निवृत्त झाले आहेत व त्यापूर्वी दोन वर्षे अगोदर १९९८ मध्ये त्यांनी व इतर अधिकाऱ्यांनी

जाणूनबूजून केलेला हा गैरव्यवहार आहे. सर्वांनी संगनमताने केलेले हे गैरकृत्य आहे कारण त्यावेळी या गैरव्यवहाराचे लेखापरिक्षण झालेले नव्हते. म्हणून ते सुखरुप निवृत्त झालेले आहेत. समिती या सर्व अधिकाऱ्यांना दोषी धरीत आहे आणि सहव्यवस्थापकीय संचालकांना सर्वात जास्त दोषी धरीत आहेत. कारण त्यांची जबाबदारी मोठी होती ती त्यांनी प्रामाणिकपणे पार न पाडता स्वतःच्या स्वार्थासाठी महामंडळाचे करोडो रुपयांचे नुकसान केलेले आहे. म्हणून समिती आग्रहाची शिफारस करते की, रु.४.१६ कोटीचे नुकसान भरुन काढण्यासाठी त्यावेळचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री.ए.एन. शेट्टी यांच्याविरुध्द महामंडळाने फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि त्यांनी गैरमार्गाने मिळविलेली स्थावर व जंगम मालमत्ता न्यायालयामार्फत जप्त करुन ते जरी सेवा निवृत्त झाले असले तरी त्यांचेकडून नुकसानीची भरपाई वसूल करण्यात यावी. तसेच नागपूर कार्यालयातील दुसरे जे अधिकारी तपासणी अहवालानुसार दोषी आढळून आले आहेत त्यांच्यावरही जबाबदारी निश्चित करुन कडक कारवाई करण्यात यावी. या प्रकरणी कामगार सल्लागार (श्री.पाटणकर) यांच्या अहवालाच्या आधारे श्री. शेट्टी यांच्याविरुध्द काहीही कारवाई करण्यात आलेली नाही असे महामंडळाने नमूद केले आहे. समितीच्या मते एवढे सगळे उघड-उघड घडूनही श्री. शेट्टी यांना निर्दोष ठरविणारे कामगार सल्लागार देखिल या प्रकरणी दोषि ठरतात. त्यांचा अहवाल पूर्णपणे चुकीचा होता. त्यामुळे त्यांच्या विरुध्द देखिल महामंडळाने योग्य ती कारवाई करावी. या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला फक्त तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

**पाच : सातारा येथील एककाने अनधिकृतरित्या काढलेला मालसाठा -**

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००१-२००२ च्या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेद क्रमांक २.६.५.२ मध्ये "सातारा येथील एककाने अनधिकृतरित्या काढलेला मालसाठा "या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की -

सुधारित वखारपालन व पतसवलत योजनेअंतर्गत, ५०० मे.टन. इनगॉट्स /बिलेट्सचा पुरवठा करण्यासाठी कंपनीच्या पुणे विभागाने कुटाळे स्टील रोलींग मिल्य प्रा.लिमिटेड बरोबर करार केला होता (सप्टेंबर १९९९). एककाच्या गोदामाची साठवण क्षमता ५०० मे.टन असल्याचे शाखा व्यवस्थापक, सातारा यांनी प्रथम प्रमाणित केले होते परंतु गोदामामध्ये कोणतीही सुधारणा न करता साठवण क्षमता ९०० मे.टन एवढी सुधारित केली होती. गोदामाची सुरक्षितता सुध्दा विभागीय व्यवस्थापक यांनी प्रमाणित केली होती. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मालसाठ्याची तपासणी केली असता (मार्च २०००) रुपये ०.५५ कोटी किंमतीचा ४८८ मे.टनाचा मालसाठा गहाळ झाल्याचे आढळून आले होते. विभागीय कार्यालयाने पोलीसांकडे एफ.आय.आर.दाखल केला (१५ मार्च २०००) त्याचे परिणाम प्रलंबित होते (मार्च २००२).

लेखापरिक्षणाला या प्रकरणात खालील अनियमितता आढळून आल्या :-

१) एककाने २७ सप्टेंबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत ८२७.४८५ मे.टन कच्च्यामालाचे मागणीपत्रक कंपनीमार्फत पाठविण्याऐवजी सरळ पुरवठाकाराला (रुपये ०.९५ कोटी) पाठविले. परंतु विभागीय कार्यालयाने त्याबाबत आक्षेप घेतला नव्हता. ही मागणीपत्रके कच्चा काल मिळाल्यानंतर नियमात बसविण्यात येऊन कंपनीने ते योजनेच्या तरतुदीच्या विरोधात असतांनाही त्याचे प्रदान केले होते.

२) विभागीय व्यवस्थापक,पुणे यांनी गोदामाची सुरक्षितता प्रमाणित केलेली असतांनाही गोदाम वरुन उघडेच होते.

३) गोदामामधील सामानाची देखभाल करण्याचे काम योजनेच्या आवश्यकतेनुसार कंपनीने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकाऐवजी एककाने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकामार्फत करण्यात आले.

४) पोहचवणी व माल स्विकृत कामाचे शाखा अधिकारी, सातारा यांनी पर्यवेक्षण केले नव्हते व ते काम रोजंदारीवर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात आले होते. ज्याला वखार पाल योजनेतील पध्दतीची माहिती नव्हती. कंपनीने जबाबदार अधिकारी विशेषतः विभागीय व्यवस्थापक,पुणे व शाखा व्यवस्थापक, सातारा यांच्या विरध्द कोणतीही कारवाई केली नव्हती.

अशारितीने कार्यान्वयनातील त्रुटींमुळे एककाने रुपये ०.५५ कोटीचा मालसाठा अनधिकृतरित्या काढला होता. मार्च २००२ रोजी एककाकडे व्याजासह असलेली थकित रक्कम रुपये ०.७६ कोटी एवढी हाती व त्याबाबत दिवाणीदावा दाखल करण्यात आला नव्हता (मार्च २००२).

५.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने असे नमूद केले की,मे. खुटाळे रोलिंग मिल्स यांच्याकडून रु.५६.४२ लाखाची थकबाकी होती. न्यायालयाचा आदेश मिळाल्यानंतर महामंडळाने मालाची विक्री करुन रु.१२.०० लाखाची वसुली केली. महामंडळाने दिवाणी दावा तसेच एनआयए (निगोशिएशन इंन्स्ट्रुमेंट ॲक्ट) अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. सदर लघुउद्योगाने आपल्या वकिलामार्फत न्यायालयाशी संपर्क साधून या प्रकरणी समझोता करण्याची तयार दर्शविली आहे. तथापि, दिवाणी दाव्यात गुंतलेली रक्कम फार मोठी असल्यामुळे, महामंडळाने न्यायालयामार्फत सदर लघुउद्योगाच्या वकिलातर्फे त्यांना कळविले आहे की, सदर लघुउद्योगांने ह्याबाबतीत सर्व व्यापक प्रस्ताव सादर करावा. सदर लघुउद्योगाकडून प्रतिसाद प्रतिक्षित आहे. संबंधित कर्मचाऱ्यांची कार्यालयीन चौकशी पूर्ण झाली आहे आणि त्यानुसार चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल प्रतिक्षित आहे. या अहवालाआधारे व्यवस्थापनास पुढील कारवाई करता येईल.

५.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

५.४ शासनाच्या व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या लेखी खुलाशावर समितीने दि. २० सप्टेंबर २००६ रोजी विभागीय सचिवांची व महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी, व्यवस्थापकीय संचालकांनी विषद केले की, या प्रकरणी संबंधीत युनीट व अधिकारी यांचेविरुध्द मार्च, २००० मध्ये एफ. आय.आर. दाखल केलेला आहे व सदर युनिटला फरार म्हणून जाहिर करण्यात आले आहे. गोदामाची साठवण क्षमता ५०० मे.टन. असताना गोदामामध्ये कुठल्याही प्रकारची सुधारणा न करता, क्षमता नसतानासुध्दा ९०० मे.टन. मालसाठ्याची साठवण क्षमता असल्याची मान्यता देण्यात आली होती. यामध्ये महामंडळाचे अधिकारी सामील आहेत काय, या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर घटना २००० मधील असून या प्रकरणी १५ मार्च, २००० मध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये कुणी दोषी असतील तर त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी लागेल. व्यवस्थापकीय संचालकांनी या मुद्यावर चर्चा करताना पुढे सांगितले की, संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करण्यात आली असून अहवाल अपेक्षीत आहे. तसेच १२ लाख रुपये वसुल करण्यात आले आहेत.

५.५ **<u>अभिप्राय व शिफारशी :-</u>**

सातारा येथिल एककाने अनधिकृतरित्या काढलेला मालसाठा या बाबत मिळालेली लेखी माहिती तसेच साक्षीच्या वेळी मिळालेली माहिती यावरुन असे दिसून येते की, सुधरित वखारपालन व पतसवलत योजने अंतर्गत ५०० मे.टन मालाचा पुरवठा करण्यासाठी महामंडळाच्या पुणे विभागाने कुटाळे स्टिल रोलींग मिल्स प्रा. लि. बरोबर करार केला होता. एककाच्या गोदामाची साठवण क्षमता ५०० मे.टन असल्याचे शाखा व्यवस्थापक, सातारा यांनी प्रमाणित केले असताना गोदामामध्ये कोणतीही सुधारणा न करता ९०० मे.टन एवढी सुधारित केली होती. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी मालसाठ्याची तपासणी मार्च २००० मध्ये केली असता, ५५ लाख रु. किंमतीचा ४८८ मे.टनचा माल साठा गहाळ झाल्याचे आढळून आले होते. या प्रकरणी एककाने २७ सप्टेंबर ते ३ नोव्हेंबर १९९९ या कालावधीत ८२७.४२५ मे. टन कच्चा मालाचे मागणी पत्रक कंपनीमार्फत पाठविण्याऐवजी सरळ पुरवठाकाराला रु.०.९५ कोटींचे पाठविले.

तरीही विभागिय कार्यालयाने त्याबाबत आक्षेप न घेता कच्चा माल मिळाल्यानंतर नियमात बसविण्यात येऊन ते योजनेच्या तरतूदींच्या विरोधांत असतानाही त्याचे प्रदान केले होते. ही सर्व परिस्थिती विचारात घेता शाखा व्यवस्थापक, सातारा आणि कुटाळे स्टिल रोलींग मिल्स यांच्यामध्ये संगनमत होऊनच असा प्रकार घडला असावा असे समितीचे स्पष्ट मत आहे.महामंडळाचे अधिकारी महामंडळाचे हित लक्षात न घेता वैयक्तिक स्वार्थापोटी असे गैरव्यवहार करतात व त्यामुळे महामंडळाचे निरनिराळ्या प्रकारे नुकसान होते. सध्या महामंडळाची आर्थिक स्थिती खालावली आहे व त्याकरिता अशीं कृत्ये कारणीभूत ठरली आहेत. तरीही महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचा बडगा उगरला जात नाही ही अत्यंत गंभीर व शोचनीय बाब आहे. तसेच माल पोहोचवणे व स्विकृती कामाचे शाखा अधिकारी, सातारा यांनी स्वतः पर्यवेक्षण न करता हे काम रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांवर सोपविले. ज्याला या संबंधातील कार्यपध्दतीची माहिती नव्हती. तरीही विभागिय व्यवस्थापक, पुणे व शाखा व्यवस्थापक, सातारा या अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई महामंडळाने केली नव्हती. त्यामुळे मार्च २००२ पर्यंत एककाकडे व्याजासह थकित असलेली रक्कम ७६ लाख रु. एवढी होती आणि ती रक्कम वसूल करण्यासाठी २००२ पर्यंत दिवाणी दावाही दाखल करण्यात आला नव्हता. या प्रकरणी आता कुटाळे रोलींग मिल्सकडून रु.१२ लाखांची वसूली केली आहे. तसेच दिवाणी दावा एनआयए अंतर्गत तक्रार दाखल केली आहे, हे जरी खरे असले तरी अद्यापि फार मोठी रक्कम वसूल होणे आहे. तसेच विभागीय व्यवस्थापक, पुणे व शाखा व्यवस्थापक, सातारा या अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल प्रतिक्षित आहे असे साक्षीच्या वेळीही सांगण्यात आले. वास्तविक हे प्रकरण १९९९ चे असून मार्च २००२ मध्ये दिवाणी दावा दाखल केला आहे. तसेच सदर अधिकाऱ्यांविरुध्दचा चौकशीचा अहवालही अद्याप प्रलंबित आहे. म्हणजेच चौकशी अधिकारी व महामंडळ हे प्रकरण कसे टाळता येईल याच विचारात असल्याचे दिसून येते. खरं म्हणजे हे अधिकारी या संबंधात दोषी असल्याचे उघडपणे दिसून येत आहे. त्यांना वाचविण्यासाठीच चौकशी अहवालास विलंब केला जात आहे असे समितीचे मत आहे. तसेच सदर लघुउ्द्योजक सद्या फरार असल्याचेही साक्षीच्या

वेळी सांगण्यात आले. या वरुनच याप्रकरणामधून काय निष्पन्न होईल याची कल्पना येते. महामंडळाचे जे अधिकारी यामध्ये अडकले आहेत त्यांच्या सल्ल्यावरुनच सदर लघुउद्योजक फरार झाला असल्याचा संशय समितीस येत आहे. हे सर्व प्रकरण विचारात घेता, गोदामाची साठवण क्षमता, गोदामाची सुरक्षा, ५५ लाख रुपयांचा माल गहाळ होणे इत्यादि सर्व गोष्टीसाठी विभागीय व्यवस्थापक, पुणे व शाखा व्यवस्थापक, सातारा हे प्रामुख्याने कारणीभूत व जबाबदार आहेत या निष्कर्षाला समिती येते. म्हणून समितीची स्पष्ट व आग्रहाची शिफारस आहे की, ज्या अधिकाऱ्यांच्या गलथानपणामुळे हे प्रकरण घडले त्यांच्याविरुध्दचा चौकशी अहवाल तातडीने प्राप्त करुन घेण्याचे दृष्टीने महामंडळाने पाऊले उचलावित. एकंदरीतच या योजनेचा महामंडळाने पूनर्विचार करावा व त्यात योग्य त्या सुधारणा घडवून आणाव्यात. धनादेश वटला न गेल्याबद्दल दाखल करण्यात आलेल्या तक्रारींचा योग्यप्रकारे पाठपूरावा करुन महामंडळाचे झालेले नुकसान कसे भरुन काढता येईल यादृष्टीने महामंडळाने पाऊले उचलावीत. या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.

**सहा : योजनेच्या अटींचे पालन करण्यात अपयश -**

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००१-२००२ च्या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेद क्रमांक २.६.६ व २.६.६.१ मध्ये "योजनेच्या अटींचे पालन करण्यात अपयश" व "बिनतारण योजना" या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला ट्रान्सफॉर्मर पुरवठा करणाऱ्या पार्कस इलेक्ट्रिल प्रायव्हेट लिमिटेड, नाशिक या लघुउद्योग एककाला कंपनीने योजनेअंतर्गत वित्तीय सहाय्य दिले (ऑक्टोबर १९९९) होते. योजनेनुसार एककाने पुरवठा केलेल्या मालाचे विक्रीचे बिल सरळ कंपनीला प्रदान करावयाचे होते. एककाने रुपये २२.२४ लाख किंमतीची बिले सादर केली होती व रुपये २० लाख बँक गॅरंटीच्या बदल्यात एककाला रुपये ४२.३४ लाखाचा कच्चा माल देण्यात आला होता. त्या व्यतिरिक्त एककाने कॉर्पोरेट गॅरंटी व वैयक्तिक गॅरंटीसुध्दा दिली होती. परंतु विहीत केलेल्या पध्दतीनुसार कंपनीने उत्तर दिनांकित धनादेश किंवा एम.एस.ई.बी. ने एककाच्या बिलांचे प्रदान केले नव्हते. कंपनीने एम.एस.ई.बी. कडून वचनपत्र न घेतल्यामुळे कंपनी एम.एस.ई.बी.ला प्रदान करण्याबाबत आग्रह करु शकली नाही. विहीत पतकालावधीत परतफेड करण्यात एककाला अपयश आल्यामुळे रुपये २० लाखाच्या बँक गॅरंटीचे रोखीकरण करण्यात आले. परंतु रुपये ७.०६ लाख व्याज अंतर्भूत असलेली थकित रक्कम रुपये २७.५४ लाख एवढी होती (मार्च २००२).

कंपनीने थकित बाकी वसूल करण्यासाठी एककाला कायदेशीर नोटीस जारी केली होती (नोव्हेंबर २००१). परंतु एककाविरुध्द दिवाणी दावा दाखल केला नव्हता (जून २००२). योजनेमधील विहीत पध्दतीमध्ये विचलन करुन एककाला पतकालावधी देण्याबाबत जबाबदारी सुध्दा निश्चित करण्यात आली नव्हती.

६.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने असे नमूद केले की, महामंडळाने लवकर वसुलीकरीता विशेष दिवाणी दावा दाखल केला होता. त्याचा निकाल महामंडळाच्या बाजून लागल्यानंतर महामंडळाच्या वकीलामार्फत हुकुमनामा बजावण्याकरिता आवश्यक असलेली कार्यवाही करण्यात येत

आहे. सदरहू कंपनीची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत जागा वितरीत झाल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाला न्यायालयाच्या निकालाची प्रत देवून महामंडळाचे पैसे वसूल करण्याकरीता व पुढील कार्यवाहीकरीता योग्य ती मदत करण्याची विनंती करण्यात येईल.

६.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

६.४ शासनाकडून व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे दिनांक २० सप्टेंबर २००६ रोजी महामंडळाच्या व विभागाच्या प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी विषद केले की, योजनेनुसार एककाने पुरवठा केलेल्या मालाचे विक्रीचे बील कंपनीला अदा करावयाचे होते. एककाने २२.२४ लाख रुपयांच्या किंमतीची बिले सादर केली होती. या २० लाख रुपयांच्या बँक गॅरंटीच्या बदल्यात एककाला ४२.३४ लाख रुपयांचा माल देण्यात आला होता. त्या व्यतिरिक्त एककाने कॉर्पोरेट व वैयक्तिक गॅरंटीसुध्दा दिली आहे. तसेच मा. न्यायालयाने देखील डिक्री दिली होती व वसुलीकरण्याची कारवाई सुरु आहे.

६.५ **<u>अभिप्राय व शिफारशी :-</u>**

योजनेच्या अटींचे पालन करण्यात अपयश असे हे प्रकरण आहे. पार्कस् इलेक्ट्रिकल प्रा.लिमिटेड या नाशिकच्या लघुउद्योजकाला महामंडळाने ऑक्टोबर १९९९ मध्ये वित्तीय सहाय्य दिले होते. २० लाख रुपयाच्या बँक गॅरन्टीच्या मोबदल्यात रु.४२.३४ लाखाचा कच्चा माल देण्यात आला होता. या योजनेनुसार एककाने पुरवठा केलेल्या मालाचे विक्रीचे बिल विद्युत मंडळाने सरळ महामंडळास प्रदान करावयाचे होते. परंतु महामंडळाने विद्यूत मंडळाकडून वचनपत्र न घेतल्यामुळे ते बिलाबाबत विद्यूत मंडळाकडे आग्रह धरु शकले नाही. २० लाख रु.च्या बँक गॅरन्टीची रक्कम वसूल झाली परंतु व्याजासह थकीत रक्कम रु.२७.५८ वसूल व्हावयाची होती. याप्रकरणी सुरुवातीला महामंडळाने दिवाणी दावा दाखल केलेला नव्हता. केवळ नोटीस दिली होती. परंतु रक्कम वसूल होत नाही असे दिसताच नंतर दिवाणी दावा दाखल करण्यात आला. त्याचा निकालही महामंडळाच्या बाजूने लागला. परंतु हूकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी लघुउद्योजकाची जागा एमआयडीसी मार्फत

वितरीत झाली असल्याने, त्यांना हुकूमनाम्याची प्रत देऊन पैसे वसूल करण्याचे प्रयत्न महामंडळाने चालू केले आहेत. प्रकरण १९९९ चे असून २००६ पर्यंत पूर्ण ७ वर्षे झाली आहेत. २० लाख रुपयाची बँक गॅरन्टी असताना रु.४२.३४ लाखाचा कच्चा माल कसा देण्यात आला हा महत्त्वाचा प्रश्न आहे. शिवाय विद्युत मंडळाकडून वचनपत्र का घेण्यात आले नाही हाही प्रश्न आहे. समितीच्या मते हा महामंडळाच्या निष्काळजीपणाचा व गलथान कारभाराचा नमुना आहे. महामंडळाचे अधिकारी नियमबाह्य वर्तन कसे करतात व त्यांच्यावर महामंडळाचे नियंत्रण का नाही हाच महत्त्वाचा मुद्दा येथे विचारात घेतला पाहिजे त्याशिवाय याप्रकरणी महामंडळाने दिवाणी दावाही वेळचे वेळी केला नाही. अन्यथा रक्कम यापूर्वीच वसूल झाली असती. महामंडळाने योग्य ती कार्यवाही न केल्यामुळे हे नुकसान झाले आहे यात वाद नाही. समितीच्या मते महामंडळावर शासनासहीत कोणाचेही, कसलेही नियंत्रण नसल्यामुळे अशी प्रकरणे घडतात. ही परिस्थीती जवळ-जवळ सर्वच बहुतांश महामंडळाच्या बाबतीत समितीला दिसून आली असून ही अत्यंत चिंतनीय बाब आहे. जनतेच्या पैशाचा अशारितीने होणारा अपव्यय टाळणे हे शासनाच्या आणि महामंडळाच्याही दृष्टिने अत्यंत आवश्यक आहे. या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याचे दृष्टीने महामंडळाने तसेच शासनाने कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा या महामंडळाचा भविष्यकाळ अंधारमय होण्याचा धोका संभवतो. म्हणून समितीची आग्रहाची शिफारस आहे की, या गैरव्यवहारास तसेच हलगर्जीपणास जे जबाबदार आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कडक कारवाई करण्यात यावी. दिवाणी दाव्याच्या निकालानुसार वसूली करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची मदत घ्यावी लागणार आहे. त्यामुळे त्या दृष्टीने महामंडळाने तातडीने पाऊले उचलावित. अंतर्गत लेखापरिक्षणात अथवा महालेखापालांच्या लेखापरिक्षणात जे आक्षेप घेण्यात आले असतील त्यानुसार त्वरीत चौकशी करुन संबंधितांवर कारवाई सुरु करण्यात यावी. जेणेकरुन समितीसमोर प्रकरण आल्यावर चौकशी करु असे थातूर मातूर उत्तर देण्याची पाळी महामंडळावर येणार नाही. समितीसमोर प्रकरण येईपर्यंत चौकशी तसेच संबंधीतांवर कारवाई झालेली असली पाहिजे. असे केल्यास बैठकीचेवेळी

कारवाई करण्याबाबतचे निर्देश देण्याची पाळी समितीवर येणार नाही. यासंबंधात गांभिर्याने दखल घेऊन महामंडळाने तातडीने उपाययोजना कराव्यात. याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा

**सात : अस्तित्वात असलेल्या कोणत्याही योजनांच्या व्याप्तीत नसलेली विलक्षण पतसवलत देणे -**

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००१-२००२ च्या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेद क्रमांक २.६.७ मध्ये "अस्तित्वात असलेल्या कोणत्याही योजनांच्या व्याप्तीत नसलेली विलक्षण पतसवलत देणे" या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

जसवंत स्टील रोलींग मिल्स मर्यादित (एकक) हिंगणघाट ही कंपनी उधारीवर कच्चा माल (बिलटेस/ब्लूम्स) मिळण्यासाठी कंपनीच्या नागपूर विभागाकडे आली होती. एककाने बँक गॅरंटी / पतपत्र सारखी कोणतीही सुरक्षा देण्यात असमर्थता दर्शविली होती. त्यावेळच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालकाने याबाबत संचालक मंडळाची विशिष्ट मान्यता न घेता एकका बरोबर मालमत्तेच्या समान गहाणपत्र कार्यान्वीत करुन व मालमत्तेच्या मूल्यांकन करणाऱ्यांने निर्धारित केलेल्या किंमतीच्या १०० टक्क्यांपर्यंत कच्चा माल देण्याचे व जर एककाला देय रक्कम देण्यात अपयश आले तर त्यासाठी पीडीसीज (पोस्ट डेटेड चेक्स) घेण्याचे ठरविले होते (जानेवारी १९९७).

मूल्यांकन करणाऱ्याने (डी.डब्ल्यू. वाडेगावकर) मालमत्तेची किंमत रुपये ९.५५ लाख निर्धारित केली होती व विभागीय कार्यालयाने एककाला फेब्रुवारी १९९७ मध्ये रुपये ८.८० लाख किंमतीचा कच्चा माल दिला होता. एककाने देणे रक्कमेची परतफेड करण्यात कसूर केली व रुपये ९.५० लाख किंमतीचे पीडीसीज जेव्हा रोखीकरणासाठी बँकेत जमा करण्यात आले (सप्टेंबर १९९७) तेव्हा ते नामंजूर झाले होते. कंपनी मालमत्ता जप्त करु शकली नाही व रुपये ८.८० लाखाचे येणे एककाकडून वसूल करु शकली नाही. कंपनीने एककाला कायदेशीर नोटीस जारी केली (नोव्हेंबर १९९९) व येण्याची वसुली करण्यासाठी एककाविरुध्द विशेष दिवाणी दावा दाखल केला त्याचे परिणाम प्रलंबित होते (मार्च २००२). कंपनीने विलक्षण पतसवलत देण्याबाबतची जबाबदारी निश्चित केली नव्हती व त्याचप्रमाणे रुपये ३३.२३ लाखाचे येणे वसूल करण्यातही कंपनीला अपयश आले होते.

७.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने असे नमूद केले की,विभागीय व्यवस्थापक, नागपूर यांना कळविण्यात आले आहे की,

मे. जसवंत स्टील रोलिंग मिल्स लि. यांच्याविरुध्द पोलिसांत महामंडळातर्फे तक्रार दाखल करावी व त्यानंतर आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास सुरुवात करावी. मे. जसवंत स्टील रोलिंग मिल्स लि. यांच्याविरुद दाखल केलेला दिवाणी दावा आता प्रगतिपथावर आहे. तथापि महामंडळाने त्वरित वसुली होण्याकरिता दिवाणी खटला दाखल केला आहे. महामंडळाने संबंधित अधिकाऱ्यास अनिवार्य निवृत्त केल्यामुळे याबाबतची जबाबदारी निश्चित करता आली नाही.

७.३ महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

७.४ शासनाकडून व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने दिनांक २० सप्टेंबर २००६ रोजी घेतलेल्या साक्षीच्या वेळी, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितले की, जसवंत स्टील रोलिंग मिल मर्यादीत, हिंगणघाट यांच्या विरुध्द दिवाणी दावा दाखल करण्यात येऊन महामंडळाच्या बाजूने डिक्री सुध्दा झाली आहे.. श्री. ए.जे.काळे, प्रमुख कच्चा माल यांना सक्तिने सेवानिवृत्त करण्यात आले आहे. या प्रकरणामधील सहभागी असलेला संबंधीत अधिकारी अन्य प्रकरणांमध्येही दोषी आढळल्यामुळे त्यांना या अगोदरच सक्तीने सेवानिवृत्त केले आहे. महामंडळाने संबंधीत अधिकाऱ्यास अगोदरच अनिवार्य निवृत्त केल्यामुळे याबाबतची जबाबदारी निश्चित करता आली नाही. हा मुद्दा अधिक विशद करताना महाव्यवस्थापक म्हणाले की, सेवानिवृत्तीचे नंतर लाभ मात्र त्यांना देण्यात आलेले नाहीत. दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, त्यावेळचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री.ए.एन. शेट्टी ज्यांनी संचालक मंडळाची विशिष्ट मान्यता न घेता एककाबरोबर मालमत्तेच्या समान गहाणपत्र कार्यान्वित करुन व मालमत्तेच्या मुल्यांकन करणाऱ्याने निर्धारित केलेल्या किंमतीच्या १०० टक्क्यापर्यंत कच्चा माल देण्याचे व त्यासाठी पीसीडीज घेण्याचे त्यांच्या अधिकारामध्ये नसतानाही ठरविले त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. यासंबंधात विभागीय सचिवांनी असे सांगितले की, हे प्रकरण १९९३ मधील असून श्री. शेट्टी २००० मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. ए.जी. चा परिच्छेद २००२ मधिल आहे. तोपर्यंत ते सेवानिवृत्त झाले होते. त्यामुळे आता त्यांचेबाबत काहीच कारवाई करता येत नाही.

७.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

जसवंत स्टिल रोलींग मिल्स ही कंपनी उधारीवर कच्चा माल मिळण्यासाठी नागपूर विभागीय कार्यालयाकडे आली होती. त्यांनी बँक गॅरंटी व पतपत्रसारखी सुरक्षा देण्यास असमर्थता दाखविली होती. तथापि, तत्कालीन संयुक्त व्यवस्थापकीय संचालकांनी (श्री. ए.एन.शेट्टी) संचालक मंडळाची मान्यता न घेता एककाबरोबर गहाणपत्र कार्यान्वित करुन मालमत्तेच्या किंमतीच्या १०० टक्के पर्यंत कच्चामाल देण्याचे व एककाला रक्कम परत करण्यास अपयश आल्यास पोस्ट डेटेड चेक्स (पिडीसीज) घेण्याचे जानेवारी १९९७ मध्ये ठरविले होते. एककाच्या मालमत्तेची किंमत मूल्यांकन करणाऱ्याने रु.९.५५ लाख केली होती व एककाला फेब्रुवारी १९९७ मध्ये रु.८.८० लाख किंमतीचा कच्चा माल दिला गेला. एककाने परतफेड करण्यात कसूर केल्याने पिडीसीज जेव्हा बँकेत जमा करण्यात आले तेव्हा ते नामंजूर झाले होते. महामंडळाकडे गहाणवटिचे संपूर्ण कागदपत्र नसल्यामुळे एककाची मालमत्त जप्त करता आली नाही. परिणामी, रु.८.८० लाखाचे येणे महामंडळ वसूल करु शकले नाही व वसूलीसाठी एककाविरुध्द दिवाणी दावा दाखल करावा लागला. साक्षीचेवेळी सांगितल्याप्रमाणे आता दिवाणी दाव्यतील डिक्री महामंडळाच्या बाजूने झालेली असली तरी प्रत्यक्ष पैशाची वसूली मात्र अद्यापि झालेली नाही. दूसरे असे की, ज्यांनी ही बेकायदेशिर पतसवलत दिली त्या तत्कालीन संयुक्त व्यवस्थापकीय संचालकांवर कोणतीही कारवाई झालेली नसून ते आता सेवानिवृत्त झालेले आहेत. या प्रकरणी व्याजासह रु.३३.२३ लाखाची रक्कम वसूल करण्यात अपयश आले.

या प्रकरणाशी संबंधीत कच्चा माल प्रमुखास अनिवार्य निवृत्त केल्यामुळे त्याच्यावर जबाबदारी निश्चित करता आली नाही. सदर अधिकारी अन्य अनेक प्रकरणांत दोषी ठरला होता. वास्तविक पहाता तत्कालीन कच्चा माल प्रमुखास सक्तीने सेवा निवृत्त करण्याऐवजी त्याच्यावर या प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन त्याच्याकडून महामंडळाचे झालेले नुकसान भरुन घेणे आवश्यक होते. परंतु तसे झाले नाही. याचा अर्थ त्यांना पाठीशी घालण्यात आले हे उघड आहे. संयुक्त व्यवस्थापकीय संचालक यांच्यावर तर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही

म्हणजेच या प्रकरणात संचालक मंडळाचा देखिल हात असावा असा संशय समितीस येत आहे. समितीच्या मते जरी ते आता सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. या प्रकरणी श्री. शेट्टी यांना वाचविण्याचाच महामंडळाने प्रयत्न केलेला आहे. समिती यासंबंधात अशी शिफारस करत आहे की, या प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची संचालकांसह चौकशी करुन महामंडळाच्या झालेल्या सर्व नुकसानीची जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करुन सर्व रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी. गरज पडल्यास न्यायालयाद्वारे त्यांच्या मालमत्तेवर टाच आणण्याची कारवाई देखिल करावी. सक्तिने सेवानिवृत्ती किंवा वेतनवाढ रोकणे यासारख्या उपाययोजनांनी हे प्रकार थांबणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत महामंडळाचे झालेले नुकसान भरुन घेतले गेले पाहिजे. अन्यथा महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कोणताही वचक राहणार नाही. या प्रकरणातील दिवाणी दाव्याची डिक्री महामंडळाच्या बाजूस झाली आहे ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. तथापि, या डिक्रीनुसार नूकसान भरपाई वसूल करण्याचे दृष्टीने महामंडळाने तातडीने पाऊले उचलावीत. या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

७.५ **अभिप्राय व शिफारशी :-**

जसवंत स्टिल रोलींग मिल्स ही कंपनी उधारीवर कच्चा माल मिळण्यासाठी नागपूर विभागीय कार्यालयाकडे आली होती. त्यांनी बँक गॅरंटी व पतपत्रसारखी सुरक्षा देण्यास असमर्थता दाखविली होती. तथापि, तत्कालीन संयुक्त व्यवस्थापकीय संचालकांनी (श्री. ए.एन.शेट्टी) संचालक मंडळाची मान्यता न घेता एककाबरोबर गहाणपत्र कार्यान्वित करुन मालमत्तेच्या किंमतीच्या १०० टक्के पर्यंत कच्चामाल देण्याचे व एककाला रक्कम परत करण्यास अपयश आल्यास पोस्ट डेटेड चेक्स (पिडीसीज) घेण्याचे जानेवारी १९९७ मध्ये ठरविले होते. एककाच्या मालमत्तेची किंमत मूल्यांकन करणाऱ्याने रु.९.५५ लाख केली होती व एककाला फेब्रुवारी १९९७ मध्ये रु.८.८० लाख किंमतीचा कच्चा माल दिला गेला. एककाने परतफेड करण्यात कसूर केल्याने पिडीसीज जेव्हा बँकेत जमा करण्यात आले तेव्हा ते नामंजूर झाले होते. महामंडळाकडे गहाणवटिचे संपूर्ण कागदपत्र नसल्यामुळे एककाची मालमत्त जप्त करता आली नाही. परिणामी, रु.८.८० लाखाचे येणे महामंडळ वसूल करु शकले नाही व वसूलीसाठी एककाविरुध्द दिवाणी दावा दाखल करावा लागला. साक्षीचेवेळी सांगितल्याप्रमाणे आता दिवाणी दाव्यतील डिक्री महामंडळाच्या बाजूने झालेली असली तरी प्रत्यक्ष पैशाची वसूली मात्र अद्यापि झालेली नाही. दूसरे असे की, ज्यांनी ही बेकायदेशिर पतसवलत दिली त्या तत्कालीन संयुक्त व्यवस्थापकीय संचालकांवर कोणतीही कारवाई झालेली नसून ते आता सेवानिवृत्त झालेले आहेत. या प्रकरणी व्याजासह रु.३३.२३ लाखाची रक्कम वसूल करण्यात अपयश आले.

या प्रकरणाशी संबंधीत कच्चा माल प्रमुखास अनिवार्य निवृत्त केल्यामुळे त्याच्यावर जबाबदारी निश्चित करता आली नाही. सदर अधिकारी अन्य अनेक प्रकरणांत दोषी ठरला होता. वास्तविक पहाता तत्कालीन कच्चा माल प्रमुखास सक्तीने सेवा निवृत्त करण्याऐवजी त्याच्यावर या प्रकरणी जबाबदारी निश्चित करुन त्याच्याकडून महामंडळाचे झालेले नुकसान भरुन घेणे आवश्यक होते. परंतु तसे झाले नाही. याचा अर्थ त्यांना पाठीशी घालण्यात आले हे उघड आहे. संयुक्त व्यवस्थापकीय संचालक यांच्यावर तर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही

म्हणजेच या प्रकरणात संचालक मंडळाचा देखिल हात असावा असा संशय समितीस येत आहे. समितीच्या मते जरी ते आता सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे.  या प्रकरणी  श्री. शेट्टी यांना वाचविण्याचाच महामंडळाने प्रयत्न केलेला आहे.  समिती यासंबंधात अशी शिफारस करत आहे की, या प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची संचालकांसह चौकशी करुन महामंडळाच्या झालेल्या सर्व नुकसानीची जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करुन सर्व रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी.  गरज पडल्यास न्यायालयाद्वारे त्यांच्या मालमत्तेवर टाच आणण्याची कारवाई देखिल करावी. सक्तिने सेवानिवृत्ती किंवा वेतनवाढ रोकणे यासारख्या उपाययोजनांनी हे प्रकार थांबणार नाहीत. कोणत्याही परिस्थितीत महामंडळाचे झालेले नुकसान भरुन घेतले गेले पाहिजे. अन्यथा महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कोणताही वचक राहणार नाही. या प्रकरणातील दिवाणी दाव्याची डिक्री महामंडळाच्या बाजूस झाली आहे ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. तथापि, या डिक्रीनुसार नूकसान भरपाई वसूल करण्याचे दृष्टीने महामंडळाने तातडीने पाऊले उचलावीत. या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

---

# बैठकींचे परिशिष्ट

---

## बुधवार, दिनांक २० सप्टेंबर, २००६ विधानभवन, मुंबई.

## उपस्थिती.

१. श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र दर्डा, वि.स.स.
(४) श्री. बंडूभाऊ सावरबांधे, वि.स.स.
(५) श्री. पी.यु.मेहता, वि.स.स.
(६) श्री. रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स.
(७) श्री. मदन पाटील, वि.स.स.
(८) श्री. अरुण पाटील, वि.स.स.
(९) डॉ. विनय नातू, वि.स.स.
(१०) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(११) श्री. संजय दत्त, वि.प.स.
(१२) श्री. सदाशिवराव पोळ, वि.प.स
(१३) श्री.अरविंद सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव
श्री. डी,एम,गवळी, समिती अधिकारी

**महालेखाकार (वाणिज्यिक) लेखा परिक्षा**
श्रीमती संगिता चौरे,महालेखाकार

**साक्षीदार**
**उद्योग,उर्जा व कामगार (उद्योग) विभाग**
श्री. व्ही.के.जयरथ,सचिव
**महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ**
श्री. एम.रमेशकुमार, व्यवस्थापकीय संचालक
श्री. सतिश गंजू, सह व्यवस्थापकीय संचालक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००२-२००३ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

# मंगळवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ विधानभवन, मुंबई.
# उपस्थिती.

**समिती प्रमुख**

(१) श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री.बंडुभाऊ सावरबांधे, वि.स.स.
(३) श्री. पी.यु. मेहता, वि.स.स.
(४) श्री. मदन पाटील, वि.स.स.
(५) श्री. अरविंद नेरकर, वि.स.स.
(६) श्री. गुलाबराव पाटील, वि.स.स.
(७) श्री. उत्तमप्रकाश खंदारे, वि.स.स.
(८) श्री. संजय दत्त. वि.प.स.
(९) श्री. सदाशिव पोळ, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. दि.वि.चोघले, अतिरिक्त सचिव,
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी.
श्री. अ.ल. जोशी, कक्ष अधिकारी

समितीने प्रारुप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करुन तो काही सुधारणांसह संमत झाला.